■ RNI NO. MAHMAR/25/A3029

■ लातूर

■ वर्ष : ७ वे, अंक नं. : २९

■ दि. १९ मे २०२६, वार : मंगळवार

■ पाने : ४, किंमत : स्वागत मूल्य २ रू.

दैनिक

# महावृत्त

E-mail : dainikmhavratt@gmail.com

संपादक : अशोक हनवते, मो. 9421094991, 7264079990

# शिवराज मोटेगावकरच्या मोबाईलमध्ये आढळली प्रश्नपत्रिका; दिल्ली न्यायालयानं ठोठावली ९ दिवसांची सीबीआय कोठडी

नवी दिल्ली: दिल्लीच्या राऊस ॲव्हेन्यू न्यायालयानं (नीट) पेपरफुटी प्रकरणात अटक करण्यात आलेल्या आणखी एका आरोपीला नऊ दिवसांच्या सीबीआय कोठडीत पाठवलं आहे. शिवराज मोटेगावकर असे या आरोपीचं नाव आहे. विशेष न्यायाधीश अजय गुप्ता यांनी आरोपीला नऊ दिवसांच्या सीबीआय कोठडीत पाठवण्याचे आदेश दिले.

शिवराज रघुनाथ मोटेगावकर याला सीबीआय कोठडीत पाठवण्यात यावे, असे आदेश न्यायालयाने दिले. सीबीआयच्या माहितीनुसार मोटेगावकर याला १७ मे रोजी महाराष्ट्रातील लातूर येथून अटक करण्यात आली होती. तपासादरम्यान, नीटची फुटलेली प्रश्नपत्रिका मोटेगावकर याच्या मोबाईल फोनमध्ये आढळून आल्यानं या प्रकरणाचं गांभीर्य वाढलं आहे.






### अनेक विद्यार्थ्यांना आरोपीनं प्रश्नपत्रिका पुरवली

सीबीआयच्या दाव्यानुसार पेपरफुटीमध्ये सहभागी असलेल्या संघटित टोळीचा (सिंडिकेटचा) मोटेगावकर हा एक सक्रिय सदस्य होता. फुटलेली प्रश्नपत्रिका शेअर करण्यात आणि कोचिंग सेंटर्सच्या माध्यमातून उत्तर पत्रिका मिळवून देण्यात त्यानं महत्त्वाची भूमिका बजावली होती. त्यानं स्वत: अनेक विद्यार्थ्यांना ही प्रश्नपत्रिका पुरवली होती.

### काय आहेत आरोप

मनीषा मांढरे १४ दिवसांच्या सीबीआय कोठडीत- यापूर्वी, १७ मे रोजी न्यायालयानं या प्रकरणातील नववी आरोपी असलेल्या मनीषा मांढरेला १४ दिवसांच्या सीबीआय कोठडीत पाठवलं आहे. एनटीए च्या वतीने प्रश्नपत्रिका तयार करण्यासाठी नेमण्यात आलेल्या समितीची (पॅनेलची) मनीषा मंधारे ही एक सदस्य होती. मनीषाला मथुरेतील एका हॉटेलमधून अटक करण्यात आली होती. प्रश्नपत्रिका फोडण्यासाठी रसायनशास्त्राचे शिक्षक पी.व्ही. कुलकर्णी आणि मनीषा वाघमारे यांच्याशी संगनमत केल्याचा आरोप मनीषा मांढरे हिच्यावर आहे. न्यायालयानं पी.व्ही. कुलकर्णी आणि मनीषा वाघमारे यांना १६ मे रोजी १० दिवसांच्या सीबीआय कोठडीत पाठवलं होतं.

### हे आरोपी आहेत कोठडीत

१५ मे रोजी न्यायालयानं धनंजय लोखंडेला सहा दिवसांच्या सीबीआय कोठडीत पाठवलं होतं. मनीषा वाघमारेनं प्रश्नपत्रिका धनंजय लोखंडे याच्याकडे सोपवली होती, असा आरोप आहे. त्यानंतर, धनंजय लोखंडे याने प्रश्नपत्रिका शुभम खैरनार याच्याकडे दिली. १४ मे रोजी न्यायालयानं पाच आरोपींना सात दिवसांच्या सीबीआय कोठडीत पाठवलं होतं. १४ मे रोजी न्यायालयानं पाच आरोपींना सीबीआय कोठडीत पाठवण्याचे आदेश दिले होते. त्यामध्ये नाशिकचा शुभम खैरनार, जयपूरचा मंगिलाल बिवाल, विकास बिवाल आणि दिनेश बिवाल तसेच गुरुग्रामचा यश यादव यांचा समावेश आहे. शुभम खैरनारला १३ मे रोजी मुंबईत अटक करण्यात आली. त्याला दोन दिवसांच्या ट्रान्झिट रिमांडवर दिल्लीला आणण्यात आलं.

## उस्मानाबाद-लातूर-बीड स्थानिक प्राधिकारी मतदारसंघ निवडणूक जाहीर; १८ जून रोजी मतदान, तर २२ जूनला होणार मतमोजणी

**लातूर/प्रतिनिधी :** भारत निवडणूक आयोगाने विधानपरिषदेच्या उस्मानाबाद-लातूर-बीड स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघ द्विवार्षिक निवडणुकीचा कार्यक्रम घोषित केला आहे. त्यानुसार २५ मे २०२६ रोजी निवडणुकीची अधिसूचना प्रसिद्ध केली जाईल. या निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज सादर करण्याची अंतिम मुदत १ जून २०२६ पर्यंत असून उमेदवारी अर्जांची छाननी २ जून २०२६ रोजी केली जाईल, तसेच उमेदवारी अर्ज मागे घेण्याची अंतिम तारीख ४ जून २०२६ अशी निश्चित करण्यात आली आहे. यानंतर गुरुवार, १८ जून २०२६ रोजी सकाळी ८ ते दुपारी ४ वाजेपर्यंत मतदान प्रक्रिया पार पडणार असून सोमवार, २२ जून २०२६ रोजी मतमोजणी केली जाईल आणि संपूर्ण निवडणूक प्रक्रिया २५ जून २०२६ पर्यंत पूर्ण केली जाईल. निवडणूक निर्णय अधिकारी तथा धाराशिवचे जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार यांनी या निवडणूक कार्यक्रमाची माहिती दिली असून केंद्रीय निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार संपूर्ण मतदारसंघात आदर्श आचारसंहिता लागू करण्यात आली असल्याचे त्यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात म्हटले आहे.

## रुग्णांनी आवश्यक औषधे आगाऊ खरेदी करून ठेवण्याचे अन्न व औषध प्रशासन विभागाचे आवाहन

**लातूर/प्रतिनिधी :** अखिल भारतीय औषधी विक्रेता संघटनेने आगामी बुधवार, २० मे २०२६ रोजी देशव्यापी संपाची हाक दिली असून, या बंदच्या पार्श्वभूमीवर लातूर जिल्ह्यातील रुग्णांची व नागरिकांची औषधांविना गैरसोय होऊ नये, यासाठी अन्न व औषध प्रशासन विभागाने खबरदारीचे आवाहन केले आहे. लातूर जिल्हा केमिस्ट अँड ड्रगिस्ट असोसिएशनच्या पत्रान्वये या संपामध्ये संघटनेच्या सभासदांनी सहभागी होऊ नये, अशी विनंती प्रशासनामार्फत १४ मे २०२६ रोजीच्या पत्राद्वारे करण्यात आली आहे. मात्र, खबरदारीचा उपाय म्हणून ज्या रुग्णांना नियमित औषधोपचारांची आवश्यकता आहे, अशा रुग्णांनी किंवा त्यांच्या नातेवाईकांनी बंदच्या कालावधीत होणारी संभाव्य गैरसोय टाळण्यासाठी आपली आवश्यक औषधे आधीच खरेदी करून ठेवावीत, असे आवाहन अन्न व औषध प्रशासनाचे सहायक आयुक्त (औषधे) ब. दा. मरेवाड यांनी केले आहे.

या बंदच्या कालावधीत जर एखाद्या गरजू रुग्णाला तातडीने औषध उपलब्ध झाले नाही किंवा अत्यावश्यक औषधांची गरज भासली, तर नागरिकांच्या मदतीसाठी प्रशासनाने संपर्क क्रमांक जाहीर केले आहेत. अशा आपत्कालीन परिस्थितीत नागरिकांनी सहायक आयुक्त (औषधे) ब. दा. मरेवाड यांच्या ८२७५१७५२३२ किंवा औषध निरीक्षक श्रीमती स्वा. क. कुपकर यांच्या ८८३०८०१८०६ या भ्रमणध्वनी क्रमांकावर थेट संपर्क साधावा. व्यापक जनहित आणि सामाजिक बांधिलकी लक्षात घेऊन जिल्ह्यातील सर्व स्थानिक वृत्तपत्रांनी या आवाहनाला प्रसिद्धी द्यावी, जेणेकरून रुग्णांची होणारी गैरसोय टाळता येईल, अशी विनंती अन्न व औषध प्रशासनाकडून जिल्हा माहिती कार्यालयाला करण्यात आली असून या संदर्भातील माहिती जिल्हाधिकारी, लातूर आणि सह आयुक्त (औषधे), अन्न व औषध प्रशासन, छत्रपती संभाजीनगर यांनाही सविनय सादर करण्यात आली आहे.

## 'जनतेसह देशाच्या हिताचे प्रश्न यापुढेही दुप्पट वेगाने मांडणार'-खासदार राघव चड्ढा यांची साईचरणी प्रार्थना

**शिर्डी/प्रतिनिधी :** खासदार राघव चड्ढा यांनी शिर्डीत येऊन साईबाबांच्या समाधीचं मनोभावे दर्शन घेतलं. साईदर्शनानंतर माध्यमांशी संवाद साधताना त्यांनी देशात सुख-शांती नांदावी, सर्वांची प्रगती व्हावी आणि देश पुढे जावा, अशी प्रार्थना साईबाबांच्या चरणी केल्याचं सांगितलं. तसेच सर्वजण निरोगी, सर्वांची प्रगती व्हावी, सर्वजण रोगमुक्त आणि आनंदी राहावेत, अशीही प्रार्थना केल्याचं त्यांनी सांगितलं. साईबाबांचे बोलावणं आलं की दर्शनाला येतो : ''मला जेव्हा थोडी जरी सवड मिळते किंवा आतून साईबाबांचे बोलावणं आल्याची भावना होते, तेव्हा मी देशाच्या कोणत्याही कोपऱ्यात असलो तरी, पहिली फ्लाईट किंवा पहिली गाडी पकडून शिर्डीत येतो. गेल्या वर्षभरात माझी आणि येथील माध्यमांची जवळपास अर्धा डझन वेळा भेट झाली आहे. यावरून मी येथे किती सातत्यानं येतो, हे स्पष्ट होतं. साईबाबा अत्यंत दयाळू आणि कृपाळू आहेत,'' असं राघव चड्ढा म्हणाले.

''साईबाबा आपल्याला एका लहान मुलाप्रमाणे जपतात, मार्गदर्शन करतात आणि सेवकाप्रमाणे सांभाळतात,'' अशी भावनाही त्यांनी व्यक्त केली. जनतेच्या प्रश्नांबाबत बोलताना राघव चड्ढा म्हणाले, ''जनतेचे आणि खऱ्या भारताचे प्रश्न मी आधीही मांडत आलो आहे. पुढेही मांडत राहीन. आता व्यवस्थेचा भाग झाल्यामुळं या समस्यांवर थेट तोडगा काढण्याची संधी मिळेल, ही सर्वात चांगली गोष्ट आहे.

## रेणापूर तालुका संजय गांधी निराधार योजना समितीच्या वतीने आ. कराड यांचे आभार

**लातूर/प्रतिनिधी :** रेणापूर तालुका संजय गांधी निराधार योजना समिती नुकतीच गठीत करण्यात आली असून या समितीच्या नवनिर्वाचित अध्यक्ष व सदस्यांनी भाजपा नेते आ. रमेशआप्पा कराड यांचा यथोचित सत्कार करून समितीच्या माध्यमातून काम करण्याची संधी दिल्याबद्दल आभार व्यक्त केले.



जिल्ह्याचे पालकमंत्री ना. शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी लातूर ग्रामीणचे आमदार श्री. रमेशआप्पा कराड यांच्या शिफारशीनुसार रेणापूर तालुका संजय गांधी निराधार योजना समिती गठीत केली आहे.

रेणापूर तालुका संजय गांधी निराधार योजना समितीवर नियुक्ती करून गोरगरीब निराधार व्यक्तींना आधार देण्याचे काम करण्याची संधी उपलब्ध करून दिल्याबद्दल लातूर ग्रामीणचे आमदार श्री. रमेशआप्पा कराड यांचा लातूर येथील भाजपाच्या संवाद कार्यालयात यथोचित सत्कार करून समिती अध्यक्ष सतीश रावसाहेब आंबेकर आणि सर्व सदस्यांच्या वतीने आभार व्यक्त करण्यात आले.

यावेळी संजय गांधी निराधार योजना समिती अध्यक्ष सतीश आंबेकर यांच्यासह रेणापूर पंचायत समितीचे उपसभापती शरद दरेकर, मुख्यमंत्री पाणंद शेत रस्ता समिती सदस्य अनिल भिसे, भाजपाचे ॲड. दशरथ सरवदे, ॲड. मनोज कराड, संजय गांधी निराधार योजना समितीचे सदस्य ललिता कांबळे, विठ्ठल कस्पटे, गोविंद देशमुख, सुरेश बुड्डे, कस्तुरबाबाई माने, संजय चव्हाण, सदानंद पिंपळे, वीरेंद्र चव्हाण, सतीश जाधव त्याचबरोबर राजेश काळे, मुकुंद मेटे, वाजिद पटेल, संदिपान मेकले, बालाजी फड यांच्यासह अनेक जण होते.

## जागृती शुगरकडून कर्मचारी अधिकाऱ्यांना राजा शिवाजी चित्रपट दाखवला




**लातूर/प्रतिनिधी :** र अवघ्या महाराष्ट्रात अभूतपूर्व प्रतिसाद मिळालेल्या व चित्रपटाचे दिग्दर्शक असलेले सिनेअभिनेते रितेश विलासराव देशमुख यांच्या राजा शिवाजी चित्रपट तळेगाव येथील जागृती शुगर अँड अलाइंड इंडस्ट्रीज लिमिटेड यांच्या वतीने कर्मचारी ,अधिकारी प्रगतिशील शेतकरी यांच्यासाठी लातूरच्या पीव्हीआर सिनेमागृहात रविवारी दाखवण्यात आला या चित्रपटाला नागरिकांमधून उत्तुंग प्रतिसाद मिळाला जय भवानी जय शिवाजी या जयघोषाने चित्रपट गृह दणाणून गेले होते रितेश देशमुखच्या नावाने जयघोष करीत टाळ्यांची दाद उपस्थित नागरिकांकडून झाली

तत्पूर्वी पीव्हीआर सिनेमागृहात जागृती शुगरचे उपाध्यक्ष लक्ष्मणराव मोरे रेणा साखर कारखान्याचे माजी अध्यक्ष तथा संचालक यशवंतराव पाटील जागृती शुगरचे संचालक दिलीप माने जागृती शुगर चे जनरल मॅनेजर गणेश येवले मुख्य शेतकी अधिकारी रामानंद कदम,मीडिया समन्वयक हरीराम कुलकर्णी यांनी चित्रपट गृहात आलेल्या मान्यवरांचे स्वागत केले यावेळी निवासी जिल्हाधिकारी नेटके,तहसीलदार तांदळे, फॉरेस्ट ऑफिसर मुगलीकर संभाजी रेड्डी बाळासाहेब जाधव अँड चव्हाण यांच्यासह देवनी शिरूर अनंतपाळ, निलंगा तालुक्यासह जवळगा, वलांडी येथील प्रगतिशील उस उत्पादक शेतकरी, मान्यवर तसेच जागृती शुगर चे कामगार, कर्मचारी, अधिकारी सहकुटुंब उपस्थित होते.

### जय भवानी जय शिवाजी गर्जनेने प्रेक्षक भारावले

राजा शिवाजी चित्रपटात लातूरचे सुपुत्र दिग्दर्शक असलेले सिनेअभिनेते रितेशदादा विलासराव देशमुख यांच्या भूमिकेने लातूरकरांच्या डोळ्यात अक्षरशः अश्रू दिसत होतें छत्रपती शिवाजी महाराजांच्या विषयी श्रद्धा भक्ती अभिमान स्पष्टपणे चित्रपटात दिसत होता उपस्थित प्रतेकांच्या मनात स्वराज्याचा इतिहास शिवरायांचे विचार अधिक दृढ होत असल्याची भावना यावेळी उपस्थित नागरिकांकडून बघावयास मिळाली.

## लातूर जिल्हा साहित्य भारती शाखेची कार्यकारिणी जाहीर



**लातूर/प्रतिनिधी :** अखिल भारतीय साहित्य परिषद पुरस्कृत साहित्य भारतीच्या लातूर जिल्हा शाखेची नूतन कार्यकारिणी नुकतीच जाहीर करण्यात आली. नुकत्याच झालेल्या बैठकीत सन २०२६ -२७ या कालावधीसाठी सर्वानुमते ही कार्यकारिणी जाहीर करण्यात आली. यामध्ये जिल्हाध्यक्षपदी इंजि. शैलजा कारंडे, कार्याध्यक्षपदी प्रो. डॉ. रामचंद्र पस्तापुरे, उपाध्यक्षपदी डॉ. नयन राजमाने यांची निवड करण्यात आली. संघटन मंत्री प्रा. डॉ. बालाजी भंडारे, सहमंत्री - श्रीमती उषा भोसले, कोषाध्यक्ष डॉ. प्रणिता चाकूरकर, कार्यालय प्रमुख श्री उमेश सेलुकर, लोकसाहित्य कार्य प्रा. डॉ. विजयकुमार ढोले, बालसाहित्य कार्य वृषाली पाटील, युवा साहित्यिक प्रतिनिधी म्हणून देवांश बालाजी पाचंगे, प्रचार व समाज माध्यम प्रमुख म्हणून डॉ. रामशेट्टी शेटकार यांची निवड करण्यात आली. महिला साहित्यिक प्रमुखपदी अश्विनी निवर्गी यांची निवड केली आहे. मार्गदर्शक म्हणून मा. प्रवीणजी सरदेशमुख व प्रा.डॉ. सुनिता सांगोले. या निवडीबद्दल साहित्य भारतीचे प्रांत महामंत्री युवराज नळे, प्रांताचे नितीन केळकर, शशिकांत घासकडबी, प्राचार्य संजीव गीरासे, डॉ. सर्जेराव जिगे, उमेशजी काळे, डॉ. रविंद्र बेंम्बरे, डॉ. नरेंद्रजी पाठक आदींसह साहित्य भारती परिवाराच्या वतीने नूतन कार्यकारिणीचे अभिनंदन करण्यात आले.

## एमआयटी फार्मसी ची कु. प्रणिता झिरमाळे विद्यापीठात सर्वप्रथम; आ. रमेशआप्पा कराड यांच्याकडून अभिनंदन

**लातूर/प्रतिनिधी :** स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठद्वारे घेण्यात आलेल्या औषध निर्माणशास्त्र (बी फार्मसी) प्रथम वर्ष परीक्षेत लातूर येथील महाराष्ट्र इन्स्टिट्यूट ऑफ फार्मासुटिकल सायन्सेस महाविद्यालयाची विद्यार्थिनी कु. प्रणिता झिरमाळे हिने ९.२६ एसजीपीए () गुण घेऊन संपूर्ण विद्यापीठात प्रथम क्रमांक मिळवला आहे. या यशाबद्दल लातूर एमआयटीचे कार्यकारी संचालक आ. रमेशआप्पा कराड यांनी यथोचित सत्कार करून अभिनंदन केले.



लातूर एमआयटीचे महाराष्ट्र इन्स्टिट्यूट ऑफ फार्मासुटिकल सायन्सेस हे औषध निर्माण शास्त्र महाविद्यालय दोन वर्षांपूर्वी सुरू झाले असून या महाविद्यालयात अद्यावत प्रयोगशाळा, स्मार्ट क्लास रूम, डिजिटल ग्रंथालय आणि सुसज्ज इमारत असून तज्ञ प्राध्यापकाच्या मेहनतीने प्रारंभापासूनच गुणवत्तेकडे प्राधान्याने लक्ष दिले जात आहे. महाराष्ट्र इन्स्टिट्यूट ऑफ फार्मासुटिकल सायन्सेस महाविद्यालयातील विद्यार्थिनी कु. प्रणिता झिरमाळे हिने ९.२६ एसजीपीए () गुण घेऊन संपूर्ण विद्यापीठात प्रथम क्रमांक मिळवला आहे तसेच महाविद्यालयातील कु. संजीवनी कांबळे ८.७२ एसजीपीए () कु. दुर्गा किर्दंत व ओमकार सुरोशे ८.६३ एसजीपीए () गुण घेऊन महाविद्यालयात अनुक्रमे द्वितीय व तृतीय क्रमांक पटकावला आहे. या उल्लेखनीय यशाबद्दल तिन्ही गुणवंत विद्यार्थ्यांचे एमआयटीचे कार्यकारी संचालक तथा लातूर ग्रामीणचे आमदार श्री. रमेशआप्पा कराड यांनी यथोचित सत्कार करून कौतुक केले व भविष्यातही अशाच उल्लेखनीय यशाची कामगिरी करतील अशी अपेक्षा व्यक्त केली.

लातूर एमआयटी संकुल समन्वयक श्री. पृथ्वीराजदादा कराड यांनी या यशाबद्दल सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचे कौतुक करून महाविद्यालयाच्या प्रगती बद्दल समाधान व्यक्त केले. याप्रसंगी महाविद्यालचे प्राचार्य डॉ. वैजिनाथ डिग्गे, संस्थेचे प्रशासकीय अधिकारी श्री. मधुकर गुट्टे, महाविद्यालयाचे प्रा. आदित्य देशमुख, प्रा. चैतन्य सिरसाट, प्रा. प्रतीक ढाकणे, प्रा. अस्लम सय्यद, प्रा. सरोजा काळजाते, प्रा. सुचिता खंदाडे, प्रा. सोनल साळुंके, प्रा. नेहा पाटील, तसेच महाविद्यालयातील कर्मचारी सर्व श्री. विठ्ठल फड, ओंकार भिसे, विशाल हल्लाळे, ज्योती केंद्रे, सैफ नाईकवाडे, बाळू हलकंचे, शुभम साखरे, वैजनाथ कातकडे, रवि राठोड इत्यादी उपस्थित होते.

संपादकीय...

## लातूर पॅटर्न, नीट प्रकरण आणि विश्वासघाताचे गालबोट

लातूर म्हटले की महाराष्ट्राच्या शैक्षणिक नकाशावर एक वेगळी ओळख डोळ्यांसमोर उभी राहते. दुष्काळ, भूकंप आणि आर्थिक अडचणींवर मात करत शिक्षणाच्या जोरावर स्वतःचे स्वतंत्र स्थान निर्माण करणारा हा जिल्हा आहे. या जिल्ह्याला 'लातूर पॅटर्न' ही ओळख मिळवून देण्यात लोकनेते, माजी मुख्यमंत्री तथा केंद्रीय मंत्री स्वर्गीय विलासराव देशमुख यांचे मोठे योगदान होते. शिक्षणाच्या माध्यमातून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना मोठी स्वप्ने पाहण्याची ताकद त्यांनी दिली. लातूर पॅटर्न ही केवळ शिकवणीची पद्धत नव्हती, तर ती मेहनत, शिस्त आणि गुणवत्तेवर उभी राहिलेली चळवळ होती. हजारो सामान्य कुटुंबातील विद्यार्थी डॉक्टर, अभियंते आणि अधिकारी बनले. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून विद्यार्थी लातूरमध्ये येऊ लागले. लातूरचे नाव देशभरात शैक्षणिक केंद्र म्हणून प्रसिद्ध झाले. स्वर्गीय विलासराव देशमुख यांनी शिक्षणाला विकासाचे प्रभावी साधन मानले. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण मिळाले पाहिजे, यासाठी त्यांनी सातत्याने प्रयत्न केले. त्यांच्या नेतृत्वाखाली लातूरने शिक्षण क्षेत्रात वेगळी उंची गाठली. त्यामुळे 'लातूर पॅटर्न' हा एक विश्वासाचा ब्रँड बनला. मात्र, गेल्या काही दिवसांपासून समोर येत असलेल्या नीट पेपरप्रकरणामुळे या विश्वासाला मोठा धक्का बसला आहे. आरसीसी संस्थेचे संचालक शिवराज मोठे गावकर यांना सीबीआयने अटक करून दहा दिवसांची कोठडी मिळवली, ही घटना संपूर्ण राज्यासाठी धक्कादायक ठरली आहे. शिक्षणाच्या मंदिरात जर गैरप्रकारांचे सावट निर्माण झाले, तर समाजाचा विश्वास डळमळीत होतो. नीट परीक्षा ही देशातील लाखो विद्यार्थ्यांच्या भविष्याशी संबंधित असलेली महत्त्वाची परीक्षा आहे. ग्रामीण भागातील गरीब आणि मध्यमवर्गीय विद्यार्थी रात्रंदिवस मेहनत करून या परीक्षेची तयारी करतात. अशा वेळी पेपरफुटी, गैरव्यवहार किंवा पैशांच्या जोरावर यश मिळवण्याचे प्रकार समोर येणे अत्यंत गंभीर आहे. लातूर पॅटर्नने विद्यार्थ्यांना कष्ट, प्रामाणिकपणा आणि शिस्त यांची शिकवण दिली. पण आज काही व्यक्तींच्या लोभामुळे या परंपरेला गालबोट लागल्याची भावना समाजात निर्माण झाली आहे. एका संस्थेच्या किंवा काही व्यक्तींच्या कथित गैरप्रकारांमुळे संपूर्ण लातूरची प्रतिमा मलिन होऊ नये, याचीही काळजी घेणे आवश्यक आहे. सीबीआयने या प्रकरणाचा तपास हाती घेतला असून सत्य बाहेर येणे गरजेचे आहे. कोणताही व्यक्ती कितीही प्रभावशाली असला तरी कायद्यापेक्षा मोठा नसतो. विद्यार्थ्यांच्या भविष्याशी खेळ करणाऱ्यांना कठोर शिक्षा झाली पाहिजे, अशी जनतेची अपेक्षा आहे. आज शिक्षण क्षेत्रात स्पर्धा मोठ्या प्रमाणात वाढली आहे. पालक आपल्या मुलांच्या भविष्यासाठी मोठ्या प्रमाणावर खर्च करतात. विद्यार्थीदेखील प्रचंड मानसिक तणावाखाली अभ्यास करतात. अशा परिस्थितीत जर परीक्षा व्यवस्थेवरच संशय निर्माण झाला, तर मेहनती विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास खचतो. लातूरची खरी ओळख ही मेहनती विद्यार्थ्यांची आणि समर्पित शिक्षकांची आहे. अनेक शिक्षकांनी स्वतःचे आयुष्य विद्यार्थ्यांच्या यशासाठी वाहून घेतले. त्यांच्या परिश्रमामुळेच लातूर पॅटर्न देशभर गाजला. त्यामुळे काही घटनांमुळे संपूर्ण शिक्षणव्यवस्थेवर प्रश्नचिन्ह उभे करणे योग्य ठरणार नाही. मात्र, या प्रकरणाने शिक्षण क्षेत्रातील वाढत्या व्यापारीकरणाकडेही लक्ष वेधले आहे. शिक्षण हे सेवा आणि संस्काराचे क्षेत्र असताना काही ठिकाणी ते केवळ नफ्याचे साधन बनत चालले आहे. गुणवत्तेपेक्षा जाहिरात, पैसा आणि स्पर्धा यांना जास्त महत्त्व दिले जात आहे. विद्यार्थ्यांच्या यशासाठी शॉर्टकट शोधण्याची मानसिकता समाजासाठी धोकादायक आहे. परीक्षेत यश मिळवण्यासाठी मेहनतीऐवजी गैरमार्ग स्वीकारले गेले, तर संपूर्ण पिढी चुकीच्या दिशेने जाईल. त्यामुळे या प्रकरणाकडे केवळ एका गुन्ह्याच्या चौकटीत न पाहता सामाजिक दृष्टिकोनातूनही पाहण्याची गरज आहे. सीबीआय चौकशीमुळे अनेक धक्कादायक बाबी समोर येण्याची शक्यता आहे. तपास निष्पक्ष आणि पारदर्शक झाला पाहिजे. कोणत्याही राजकीय दबावाशिवाय सत्य जनतेसमोर आले पाहिजे. कारण हा प्रश्न केवळ एका संस्थेचा नाही, तर देशाच्या शिक्षणव्यवस्थेच्या विश्वासार्हतेचा आहे. स्वर्गीय विलासराव देशमुख यांनी लातूरला शिक्षणाचे सामर्थ्य दिले. त्यांनी विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण केला. त्यांचे स्वप्न हे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी देशाच्या मुख्य प्रवाहात यावे, असे होते. त्यामुळे आज निर्माण झालेल्या परिस्थितीने अनेकांना वेदना होत आहेत. लातूरच्या नावाशी जोडलेला विश्वास पुन्हा निर्माण करणे ही आजची मोठी गरज आहे. त्यासाठी शिक्षणसंस्थांनी आत्मपरीक्षण करणे आवश्यक आहे. पारदर्शकता, गुणवत्ता आणि नैतिकता यांवर भर दिला गेला पाहिजे. सरकारनेही परीक्षा व्यवस्थेत अधिक कठोर उपाययोजना करणे गरजेचे आहे. पेपरफुटी रोखण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, मजबूत सुरक्षा व्यवस्था आणि दोषींवर जलद कारवाई यावर भर दिला पाहिजे. अन्यथा विद्यार्थ्यांचा व्यवस्थेवरील विश्वास उडेल. या प्रकरणामुळे लाखो विद्यार्थ्यांच्या मनात संभ्रम आणि असुरक्षितता निर्माण झाली आहे. मेहनती विद्यार्थ्यांना न्याय मिळवून देणे ही शासन आणि यंत्रणांची जबाबदारी आहे. स्पर्धा परीक्षांमध्ये पारदर्शकता टिकवणे ही काळाची गरज बनली आहे. लातूर पॅटर्न हा एका दिवसात तयार झालेला नव्हता. अनेक शिक्षक, विद्यार्थी, पालक आणि समाजाच्या सामूहिक प्रयत्नांतून तो उभा राहिला. त्यामुळे त्याची प्रतिष्ठा टिकवणे ही देखील सर्वांची सामूहिक जबाबदारी आहे. आज आवश्यकता आहे ती दोषींना शिक्षा करण्याची आणि प्रामाणिकपणे काम करणाऱ्यांना बळ देण्याची. शिक्षण क्षेत्रातील भ्रष्ट प्रवृत्तींना वेळीच आळा घातला नाही, तर भविष्यात आणखी गंभीर परिस्थिती निर्माण होऊ शकते. लातूरने देशाला दिशा देणारे अनेक विद्यार्थी दिले आहेत. ही परंपरा कायम ठेवण्यासाठी शिक्षणव्यवस्थेतील विश्वास पुन्हा दृढ करावा लागेल. स्वर्गीय विलासराव देशमुख यांनी निर्माण केलेल्या लातूर पॅटर्नची खरी प्रतिष्ठा जपणे, हेच आजच्या पिढीसमोरील सर्वात मोठे आव्हान आहे. नीट प्रकरण हे केवळ एका संस्थेपुरते मर्यादित नसून संपूर्ण शिक्षणव्यवस्थेला जागे करणारे आहे. सत्य बाहेर आले पाहिजे, दोषींना शिक्षा झाली पाहिजे आणि विद्यार्थ्यांच्या मेहनतीचा सन्मान राखला गेला पाहिजे. तेव्हाच लातूरची ओळख पुन्हा अभिमानाने उभी राहील.

# हृदयाचे आरोग्य आणि वाईट कोलेस्ट्रॉल कमी करण्यासाठी ओट्स आहेत सर्वोत्तम

आरोग्य हे सर्वांपेक्षा किती महत्त्वाचे आहे हे वेगळे सांगण्याची गरज नाही. म्हणूनच बरेच लोक आरोग्याला प्रथम प्राधान्य देत आहेत. याकरिता अनेक लोक त्यांच्या आहारात बदल करतात आणि भर घालतात. आरोग्य सुदृढ ठेवण्यासाठी अनेक लोक योग्य अन्न खाण्याचा प्रयत्न करत आहेत जरी ते चविष्ट वाटत नसले तरी. ओट्स हा अशाच आरोग्यदायी पदार्थांपैकी एक आहे. जर आपण फायबरने समृद्ध असलेले हे ओट्स नियमितपणे खाल्ले तर ते केवळ आपल्याला वजन कमी करण्यास मदत करत नाही, शिवाय ते हृदयासाठी चांगले आहे. ओट्समुळे रक्तातील साखरेची पातळी देखील नियंत्रित राहते. यासोबतच, त्याचे इतरही अनेक फायदे आहेत. डॉ. गौतम यांनी आपल्या इंस्टाग्राम वर एक व्हिडिओ शेअर केलाय त्या व्हिडिओमध्ये त्यांनी ओट्सबद्दल महत्त्वाच्या गोष्टी सांगितल्या आहेत. ओट्स खाण्याचे काय फायदे आहेत ते सविस्तरपणे जाणून घेऊया.



ओट्स खाण्याचा एक मुख्य फायदा म्हणजे वाईट कोलेस्ट्रॉल कमी करणे. वाईट कोलेस्ट्रॉल हृदयाच्या आरोग्याला हानी पोहोचवू शकते. शरीरात वाईट कोलेस्ट्रॉल राहिल्यास हृदय योग्यरित्या कार्य करत नाही. कारण वाईट कोलेस्ट्रॉल वाढल्यास ते धमन्यांमध्ये प्लेक तयार करते. परिणामी रक्त परिसंचरण योग्यरित्या होत नाही, ज्यामुळे हृदयाच्या समस्या उद्भवतात. म्हणून, वाईट कोलेस्ट्रॉल कमी केले पाहिजे. ओट्स यासाठी खूप फायदेशीर असल्याचं म्हटलं जातं. जर तुम्ही ओट्स नियमितपणे खाल्ले तर वाईट कोलेस्ट्रॉल सहजपणे कमी होऊ शकते आणि हृदयाचे आरोग्य सुधारू शकते.


मधुमेह असलेल्या लोकांसाठी उत्तम: मधुमेह असलेल्या लोकांसाठी ओट्स खूप चांगले आहेत. त्यात बीटा ग्लुकन असते. यामुळे साखरेची पातळी नियंत्रित होण्यास मदत होते. जर मधुमेह असलेल्या लोकांनी ते नियमितपणे खाल्ले तर त्यांच्या रक्तातील साखरेची पातळी मोठ्या प्रमाणात कमी होईल. बीटा ग्लुकन हे एक फायबर आहे. हे. ते एका जेलसारखे असते. हे फायबर पचनसंस्थेचे कार्य सुधारण्यास मदत करते. यामुळे अन्न पोटात हळूहळू पचण्यास मदत होते. याव्यतिरिक्त, साखर जलद गतीने न जाता रक्तात हळूहळू शोषली जाते. जर आपण नियमितपणे ओट्स खाल्ले तर आपल्या शरीराची इन्सुलिनची प्रतिक्रिया सुधारते. शिवाय, त्यातील जास्त फायबरमुळे पोट जास्त काळ भरलेलं राहण्यास मदत होते. यामुळे खाण्याची लालसा कमी होण्यास म दत होते. ओट्समध्ये ग्लायसेमिक इंडेक्स कमी असतो. यामुळे रक्तातील साखरेची पातळी हळूहळू वाढते.

वजन कमी: ओट्सम ध्ये भरपूर फायबर आढळतात. त्यामुळे ते खाल्ल्यानंतर आपल्याला पोट भरल्यासारखे वाटते. परिणामी लवकर भूक लागत नाही. यामुळे आपल्याला निरोगी वजन कमी करण्यास मदत होते. मात्र, आपण ते साधे खाल्ले तरच परिणाम मिळतो. त्यावर उच्च-कॅलरी टॉपिंग्ज घालू नये. तसंच साखर, सिरप इत्यादी घालणे टाळावे. आपण ते ओटमील, ओट्स उपमा इत्यादी म्हणून खाऊ शकतो.

पचनसंस्थेसाठी फायदेशीर: ओट्समध्ये फायबरचे प्रमाण जास्त असते. त्यामुळे ते पचनासाठी उत्तम असल्याचं म्हटलं जातं. त्यातील विरघळणारे फायबर, विशेषत: बीटा ग्लुकन, आपल्या पोटात एक जेल तयार करते आणि मल मऊ करते. यामुळे बद्धकोष्ठतेची समस्या टाळता येते. शिवाय, त्यातील फायबर आतड्यांतील बॅक्टेरियांना मदत करते. जर आपण ते शिजवलेले खाल्ले तर ते सहज पचतात. ते कच्चे खाल्ल्यास पोटफुगीसारख्या समस्या उद्भवतात. म्हणून, शिजवून किंवा भिजवून खाणं चांगलं. ओट्समधील अँटीऑक्सिडंट्स, बी जीवनसत्त्वे आणि ऊर्जा मेंदूला चालना देते. हे सर्व मेंदूला निरोगी बनवते.

# मोबाईलने बालपण हिरावून; मानवी दिनचर्येवर घणाघाती प्रहार केला

आपण म्हणतो बालपण देगा देवा!परंतु आज आपले बालपण मोबाईल हिरावून घेत आहे ही अत्यंत चिंताजनक बाब आहे. स्मार्टफोन दिवसेंदिवस छोट्या-छोट्या बालकांसाठी व युवावर्गांसाठी घातक सिद्ध होत.त्याचप्रमाणे शाळांमध्ये सुध्दा विद्यार्थीवर्ग मोबाईलचा मोठ्या प्रमाणात वापर करीत आहे व यांचे दुष्परिणाम हळूहळू सामोरं येतांना दिसत आहे.एक वर्षांवरील मुलं रडतात म्हणून आई-वडील मुलांच्या हातात मोबाईल देवुन आपली सुटका करून घेतात.याचेही दुष्परिणाम हळूहळू समोर येतांना दिसत आहे.ही परिस्थिती फक्त भारतातच नाही तर संपूर्ण जगात आपल्याला पहायला मिळते.यामुळे जगातील संपूर्ण शाळांनी मोबाईलवर बंदी आणावी असा सुचक सल्ला युनेस्कोने दिला आहे.देशासह जगात डिजिटल क्रांती झाली अवश्य परंतु त्याचा गैरवापर विद्यार्थांच्या व युवकांच्या अंगाशी येतांना दिसत आहे.सोबतच बालवयात आई-वडील मुलांना मोबाइलच्या आहारी टाकतांना दिसतात.स्मार्टफोनमुळे सामाजिक, व्यवहारीक व इतर क्षेत्रात आमूलाग्र बदल झाल्याचे आपल्याला दिसुन येते.आज मोबाईलच्या अतिवापरामुळे कोणीही कोणासोबत समक्ष बोलायला तयार नाही,घरात सर्वसाधारण चर्चा करायला तयार नाही, कोणत्याही गोष्टीची बोलण्यातून देवाणघेवाण किंवा आदानप्रदान होत नाही कारण एक वर्षांच्या मुलांपासून ते मोठ्या पर्यंत सर्वच घंटो-न-घंटे मोबाईलमध्ये व्यस्त असतात. पालक आपल्या जबाबदारीपासुन पळ काढण्यासाठी व अतिलाडामुळे चिमुकले सुध्दा मोबाईलच्या आहारी गेले आहेत.यामुळे मानसिक आजार वाढण्याची दाट शक्यता आहे आणि वाढत आहे. मोबाईलच्या गेममध्ये युवावर्ग दिवसेंदिवस फसतांना दिसत आहे.याचे मुख्य कारण म्हणजे भारतात युवावर्ग मोठ्या प्रमाणात मोबाईलच्या आदिन झालेले आहेत. यामुळे त्यांना अनेक व्याधींचा सामना करावा लागतो आहे.शिक्षण क्षेत्रातील डिजिटल क्रांती विद्यार्थांसाठी चिंताजनक असल्याचे मत युनेस्कोच्या अहवालातून समोर आले आहे.मोबाईलचा अतिरिक्त वापर झाल्याने शैक्षणिक कामगिरी मंदावते.स्क्रीन टाईम वाढल्याने मुलांच्या भावनिक स्थिरतेवर नकारात्मक परिणाम होतो.परिणामी,मुले चिडचिडे व रागीट बनतात असेही युनेस्कोने म्हटले आहे.यामुळे मुलांमधील फिजिकल एक्टिविटी दिवसेंदिवस मोठ्या प्रमाणात कमी होतांना दिसत आहे हा अत्यंत चिंतेचा आणि गंभीर विषय आहे.देशात ७४ टक्के मुले (११ ते १७ वयोगटातील) रोज ३० मिनीटेही मैदानी खेळ खेळत नाही.त्याचप्रमाणे १६ ते ३४ वयोगटातील ५९ टक्के लोक ऑनलाईन खेळ ३-३ तास खेळण्यात मग्न असतात.म्हणजेच आजची युवा पिढी मोबाईलच्या खेळांमध्ये (गेममध्ये) किंवा सिरीयल पहाण्यात मोठ्या प्रमाणात मग्न असल्याचे स्पष्ट दिसून येते.यामुळे शरीराला आवश्यकतेनुसार पाहिजे तेवढा व्यायाम मिळत नाही.डब्लुएचओच्या रिपोर्ट नुसार भारतात ११ ते १७ वयोगटातील ७४ टक्के मुले फिजीकल एक्टिव्ह नसल्याचे सांगितले जात आहे.म्हणजेच एका आठवड्यात मुलं १५० मिनिटसुध्दा खेळत नाही किंवा शारीरिक हालचाली ज्या पध्दतीने पाहिजेत त्या पध्दतीने दिसून येत नाही.यावरून स्पष्ट होते की आजचा विद्यार्थीवर्ग व युवावर्ग दिवसेंदिवस डोक्यानी कीतीही हुशार असेल परंतु शारीरिक दृष्ट्या दिवसेंदिवस खालावत असल्याचे दिसून येते. देशातील ४१ टक्के लोक



मोबाईलच्या नादामुळे शारीरिक व्यायामाच्या दृष्टीकोनातून एक्टिव नसल्याचे दिसून येते. म्हणजे आज बालपणापासुन तर युवा वर्गापर्यंत आणि युवावर्गापासुन तर वयस्कर लोकांना सुद्धा मोबाईलने चांगलेच जखडल्याचे आपण पहातो.यामुळे शरिराला ज्या पध्दतीने आणि ज्याप्रमाणात व्यायामाची आवश्यकता आणि गरज आहे तो मिळत नसल्याने अनेक व्याधी किंवा आजार बालकांमध्ये, युवावर्गामध्ये व अन्य लोकांमध्ये दिसून येते व यांचा परिणाम आरोग्यावर मोठ्या प्रमाणात विपरीत परिणाम होत आहे. आज भारतातच नाही तर संपूर्ण जगात मोबाईल शिवाय जिवन अधुरे असल्याचे सर्वांना वाटते. परंतु मोबाईलचा वापर दिवसेंदिवस मानवाच्या दृष्टीकोनातून अत्यंत घातक सिद्ध होत आहे हेही तितकेच सत्य आहे याला कोणीही नाकारू शकत नाही.म्हणजेच मोबाईलचा अती वापर जीव घेणा सीध्द होवू शकते यालाही नाकारता येत नाही.मानवाच्या मेंदूला (मस्तिष्कला) रक्तपुरवठा व्यवस्थित आणि सुरळीत झाला नाही तर (स्ट्रोक)होण्याचे मोठे कारण ठरू शकते. स्ट्रोक म्हणजे पॅरालिसीसचा ॲटॅक अथवा लकवा किंवा ब्रेन ॲटॅक असेही म्हणतात.देशात स्ट्रोकच्या आजाराचे जवळपास ६५ लाख रूग्ण असल्याचे सांगितले जाते.म्हणजेच आजच्या घडीला मोबाईलच्या अती वापरामुळे मानवजाती अत्यंत धोकादायक स्थितीत आल्याचे समजते. ही बाब स्पष्ट होते की मोबाईलच्या अती वापरामुळे लठ्ठपणा, शुगर (मधुमेह), डोळ्यांचा आजार ,मानेचा त्रास, मानसिक त्रास,हार्टच्या आजारासह अनेक आजार मानवाच्या शरिरात घर करीत आहे.याचे मुख्य कारण म्हणजे शरीरातील अवयवांना पाहिजे त्याप्रमाणात व्यायाम मिळतच नाही.त्यामुळे ही कठीण परिस्थिती उध्दभवत आहे. मानवाला मोबाईलमुळे जेवढा आनंद मिळतो त्यापेक्षा जास्त धोका मोबाईलमुळे होणाऱ्या आजारामुळे निर्माण होत आहे. त्यामुळे मोबाईलचा वापर कमीत कमी कसा करता येईल व आपल्याला शारीरिक दृष्ट्या कोणताही धोका निर्माण होणार नाही यापध्दतीने मोबाईलचा वापर व्हायला हवा.''अमेरिकन ॲकेडमी ऑफ पीडियाट्रिक्स या संस्थेने एका संशोधनात म्हटले आहे की दोन ते चार वर्षांच्या मुलांनी दिवसातून फार तर एक तास फोन वापरणे योग्य असल्याचे संशोधनात म्हटले आहे.चार वर्षांपेक्षा जास्त वयाच्या मुलांनी दररोज दोन तास मोबाईल वापरणे योग्य आहे.यापेक्षा जास्त मोबाईल वापरल्यास डोळ्यासोबतच मानसिक आरोग्यावरही विपरीत परिणाम होतो यानंतर यांचे भयंकर परिणाम भोगावे लागू शकतात.आपण काय करायचं आणि काय करू नये हे आपणच ठरवू शकतो व धोकादायक वस्तू पासून दुर राहु शकतो.आज आपण पहातो ३ ते २० वर्षे वयोगटातील मुले-मुली टीव्ही पहाताना,जेवतांना मोबाईलला चीपकुन रहातात. जनुकाय मोबाईल बीना जिवन अधुरे आहे की काय अशी परिस्थिती दिसून येते.याचा दुष्परिणाम पुढेचालुन भयानक होवू शकतो.छोटे मुलं रडायला लागले की आई-वडिल त्यांच्या हातात मोबाईल देऊन मोकळे होतात परंतु हे घातक आहे. त्यामुळे पालकांना आग्रहाची विनंती करतो की मुलांना मोबाइल पासून जितके दुर ठेवता येईल तितके दुर ठेवलेच पाहिजे. यामुळे मुलांना फिजिकल एक्टीव्हीटी किंवा व्यायाम करण्यास मदत होईल.मोबाईलचा अती वापर शरिराला घातक आहेच त्याचबरोबर त्याचा गैरवापर केला तर जीवाला सुध्दा धोका निर्माण होऊ शकतो आणि होत आहे. आजही लोक वाहन चालवितांणा मोबाईलवर बोलत रहातात यामुळे अनेक दुर्घटना झाल्याचे आपण पहातो आणि यामुळे देशात मोठ्या प्रमाणात जीवीत हाणी सुध्दा झाल्या आहेत. मोबाइल वापरायला हरकत नाही. परंतु त्याचा योग्यवेळी आणि कमीत कमी वापर व्हायला पाहिजे.अन्याथा मोबाईलमुळे जेवढे सुख आणि आनंद मिळतो.त्यापेक्षा हजारो पटीने आपल्याला यातना किंवा दु:ख भोगाव्या लागतील हेही तितकेच सत्य आहे. त्यामुळे मुलांनी मोबाईल हातात घेण्यापेक्षा पुस्तक, वर्तमानपत्र हातात घेतले तर बुध्दीचा विकास झपाट्याने होईल व पुस्तकी ज्ञानामुळे शरिराच्या विकासाला मोठी चालना मिळेल. आपण एकंदरीत विचार केला तर मोबाईल युगामुळे देशातील मातीतील छोटे-छोटे खेळ नामशेष झाले किंवा होण्याच्या मार्गावर आहेत.त्यामुळे अनेक आजारांचा सामना करावा लागतो आहे.आजच्या युवापिढीला जुने खेळ काय होते ते सुद्धा माहिती नाही आणि या संपूर्ण गोष्टी मोबाईलमुळे उध्दभवतांना दिसते. म्हणजेच आजचे मोबाईल युग बालकांसाठी,युवा वर्गासाठी किंवा विद्यार्थांना शारिरीक दृष्ट्या अपंग करीत असल्याचे दिसून येते.यावरून असे लक्षात येते की वर्चुअल खेळांमुळे रियल खेळ हळूहळू नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत.आज मोबाईलची दुनिया पहाता असे वाटते ''कहा गये ओ दिन''

लेखक

**रमेश कृष्णराव लांजेवार**

(स्वतंत्र पत्रकार )

मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.

## घरात खंडोबा आणि बाहेर बुद्ध चालणार नाही – बाबासाहेब

बौद्ध धम्मात मी खिचडी होऊ देणार नाही- असे बाबासाहेब म्हणतात

डॉ. मिलिंद तायडे

हे तथाकथित महार.. बौध्द
मात्र बाबासाहेबांच्या
विचारांच्या विरोधात

घरात बुध्द आणि
बाहेर बौध्द-महार
असं यांच वर्तन यांना अपेक्षित आहे
घरात बुध्द-
हे देखील अर्थ सत्य आहे

बहुतांशी घरात दर्शनी ठिकाणी बुध्द, बाबासाहेब यांच्या प्रतिमा असतात
मात्र घराच्या आतील बाजूस,
अनेक हिंदू धर्मातील ३३ कोटी देव, त्यात भर आधुनिक बुवा, बाबा त्यात साईबाबा,वित्तूबाबा इतर स्थानिक भौगोलीक बाबा यांची वर्दळ असते, हे सुखा समाधानाने नांदत असतात
हे अस झालं
वरुन किर्तन
आतून तमाशा
या तथाकथित बौद्धांचे
खाण्याचे दात वेगळे आणि दाखविण्याचे दात वेगळे खाण्यासाठी हे कवळी (नकली दात) वापरत असतात
हे तथाकथित बौद्ध आवाहन करतात- जाती सांगण्याचं
बौध्द धम्मात--.... जातीच, जाती टाकण्यासाठी सांगत आहेत ही खिचडी कशी होईल
बौध्द धम्मात-महार
बौध्द धम्मात- मातंग
बौध्द धम्मात- चांभार
बौध्द धम्मात- मेहतर
बाबासाहेबांना ही संभाव्य होणारी खिचडी मान्य नाहीच बाबासाहेब हे मान्य करूच शकत नाहीत
यासाठी
बौध्द धम्मात जातींची भेसळ करून
खिचडी करू नका
हे विनंम्र आवाहन

## आदिवासी भागातील मत्स्यव्यवसायाला नवी चालना, धरती आबा जनजातीय ग्राम उत्कर्ष अभियान योजनेचा मंत्री नितेश राणे यांनी घेतला आढावा

**मुंबई/प्रतिनिधी :** महाराष्ट्रातील आदिवासी भागांमध्ये मत्स्यव्यवसायाच्या माध्यमातून रोजगारनिर्मिती व आर्थिक सक्षमीकरणाला गती देण्यासाठी राबविण्यात येत असलेल्या धरती आबा जनजातीय ग्राम उत्कर्ष अभियान योजनेच्या अंमलबजावणीचा सविस्तर आढावा मत्स्यव्यवसाय व बंदरे मंत्री नितेश राणे यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात झालेल्या बैठकीत मध्ये घेण्यात आला.

यावेळी मत्स्यव्यवसाय आयुक्त प्रेरणा देशभ्रतार, स्थानिक मच्छीमार संस्थांचे प्रतिनिधी आणि संबंधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते यावेळी बैठकीत धरती आबा जनजातीय ग्राम उत्कर्ष अभियान योजनेअंतर्गत केंद्र शासन, राज्य शासन आणि लाभार्थी सहभागातून राबविण्यात येणाऱ्या विविध मत्स्य प्रकल्पांचा आढावा घेण्यात आला. केंद्र सरकारने २०२४-२५ ते २०२८-२९ या पाच वर्षांच्या कालावधीसाठी देशभरात ३७५ कोटी रुपयांची तरतूद केली असून महाराष्ट्रालाही मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध झाला आहे.

मंत्री नितेश राणे यांनी सांगितले की, आदिवासी समाजातील युवकांना मत्स्यव्यवसायाशी जोडून त्यांना स्वावलंबी करणे हे राज्य शासनाचे प्रमुख उद्दिष्ट आहे. केंद्र व राज्य शासनाच्या योजनांचा लाभ तळागाळातील लाभार्थ्यांपर्यंत प्रभावीपणे पोहोचविण्यासाठी प्रशासनाने समन्वयाने काम करावे.मत्स्यव्यवसाय हा केवळ पूरक व्यवसाय नसून ग्रामीण व आदिवासी अर्थव्यवस्थेला बळ देणारा महत्त्वाचा उद्योग आहे. धरती आबा अभियान योजनेच्या माध्यमातून आदिवासी भागात बायोफ्लॉक, फिश केज कल्चर, फिश व्हेंडिंग सेंटर, थंड साखळी सुविधा यांसारखे आधुनिक प्रकल्प उभारून रोजगारनिर्मितीला मोठी चालना मिळणार आहे.

बैठकीत पीएमएमएसवाय अंतर्गत अनुसूचित जमाती प्रवर्गातील लाभार्थ्यांना मंजूर करण्यात आलेल्या प्रकल्पांचाही आढावा घेण्यात आला. २०२०-२१ ते २०२४-२५ या कालावधीत अनुसूचित जमाती घटकांतर्गत १८० प्रकल्पांना सुमारे ३९.११ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला असल्याची माहिती सादर करण्यात आली. २०२४-२५ मध्ये राज्यस्तरीय समितीमार्फत ४६ पात्र लाभार्थ्यांचे सुमारे १४.८० कोटी रुपयांचे प्रस्ताव केंद्र शासनाकडे मंजुरीसाठी पाठविण्यात आले होते. यामध्ये मोठ्या व मध्यम आकाराच्या बायोफ्लॉक प्रणाली, जलाशयातील केज कल्चर, इन्सुलेटेड वाहने, मोटारसायकल विथ आइस बॉक्स तसेच जिवंत मासळी विक्री केंद्रांचा समावेश होता.

केंद्र शासनाने त्यापैकी ९.७१ कोटी रुपयांच्या आराखड्यास मंजुरी दिली असून त्यामध्ये बायोफ्लॉक युनिट्स, इन्सुलेटेड वाहने, मासळी विक्री केंद्रे आणि जलाशयातील मत्स्यसंवर्धन प्रकल्पांना प्राधान्य देण्यात आले आहे.

# संक्षिप्त...

## राज्यपाल जिष्णू देव वर्मा यांची दिव्यांग व अनाथ मुलांच्या काष्ठ कलाकृती प्रदर्शनाला भेट

**मुंबई/प्रतिनिधी :** मतिमंद व अनाथ मुलांचे पालक शंकरबाबा पापळकर यांनी मुंबईत आयोजित केलेल्या काष्ठशिल्प कलाकृतींच्या प्रदर्शनाला राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांनी भेट दिली व दिव्यांग कलाकारांनी तयार केलेल्या कलाकृतींचे अवलोकन केले. यावेळी राज्यपालांनी काष्ठशिल्प कलाकारांशी संवाद साधला तसेच शंकरबाबा पापळकर यांच्या कार्याचे कौतुक केले. शंकरबाबा पापळकर यांनी यावेळी राज्यपालांना विविध काष्ठशिल्पांच्या वैशिष्ट्यांची माहिती दिली. शंकरबाबा पापळकर तसेच पु ल देशपांडे अकादमीच्या संचालिकमीनल जोगळेकर यांनी राज्यपालांचे स्वागत केले. पद्मश्री शंकर बाबा पापळकर यांच्या मार्गदर्शनाखाली स्व. अंबादास पंत वैद्य बेवारस दिव्यांग बालगृह, वझ्झर, जिल्हा अमरावती येथील अनाथ मुलांनी सागवान व बेल आदी लाकडापासून विविध काष्ठशिल्पे साकारली असून या कलाकृती विक्रीसाठी ठेवण्यात आल्या आहे.

यावेळी राज्यपालांचे सचिव डॉ. प्रशांत नारनवरे, कलादालनाच्या क्युरेटर वर्षा कारळे तसेच छायाचित्रकार शिरीष कारळे उपस्थित होते.

## पटेल-तटकरे नाराज? पक्षाला झळ लागण्याआधीच सुनेत्रा पवारांचा मोठा मास्टर प्लॅन! राष्ट्रवादीत मोठ्या घडामोडी

**मुंबई/प्रतिनिधी :** राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) पक्षांतर्गत मोठ्या वादाला तोंड फुटल्याच्या जोरदार चर्चा राजकीय वतुर्ळात सुरू आहेत. अजित पवार यांच्या आकस्मिक निधनानंतर पक्षाची धुरा सुनेत्रा पवार यांच्या हाती आली आहे. मात्र, मागील काही महिन्यात झालेल्या घडामोडीमुळे राष्ट्रवादी सगळं काही आलबेल नसल्याची जोरदार चर्चा सुरू झाली आहे. प्रफुल्ल पटेल आणि सुनील तटकरे यांनी पक्षाच्या राष्ट्रीय कार्यकारणीतून वगळण्यात आल्याचे समोर आले. त्यावर एकच खळबळ उडाली. आता, राष्ट्रवादीतील अस्वस्थता दूर करण्यासाठी राज्याच्या उपमुख्यमंत्री आणि राष्ट्रवादीच्या राष्ट्रीय अध्यक्षा सुनेत्रा पवार ॲक्शन मोडवर आल्या आहेत.

राष्ट्रवादी काँग्रेसच्या राष्ट्रीय कार्यकारणीच्या यादीत प्रफ ुल्ल पटेल, सुनील तटकरे यांच्या नावाचा समावेश नसल्याचे समोर आले होते. त्यानंतर राष्ट्रवादीत कुरघोडीचा डाव रंगत असल्याची चर्चा सुरू झाली. एका बाजूला ज्येष्ठ नेत्यांना डावलण्यात आले. तर, दुसरीकडे पक्षाची सगळी सूत्रे ही सुनेत्रा पवारांपाठोपाठ पार्थ पवार आणि जय पवार यांच्याकडे गेल्याचे दिसून आले. प्रफुल्ल पटेल, सुनील तटकरे यांना वगळण्यात आल्याने राष्ट्रवादी मतमतांतरे दिसून आली. त

या वादामुळे पक्षात उभी फूट पडण्याची टांगती तलवार असल्याने आता थेट उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या पत्नी सुनेत्रा पवार या पक्षात ऐक्य टिकवण्यासाठी स्वत: 'ॲक्शन मोड'वर आल्या आहेत. पक्षातील अंतर्गत विसंवाद आणि ज्येष्ठ नेत्यांमधील गैरसमज दूर करण्यासाठी त्यांनी महत्त्वाचे पाऊल उचलले आहे.

सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये गेल्या १५ दिवसांपासून अंतर्गत कलहाची चर्चा वारंवार समोर येत आहे. त्यातच पक्षाचे दोन ज्येष्ठ नेते प्रफुल्ल पटेल आणि प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे हे नाराज असल्याची चर्चा जोर धरू लागली. या दोघांनी ज्येष्ठ नेते शरद पवार यांची भेट घेतली होती.

सुनेत्रा पवार या येत्या काही दिवसात दिवसांत प्रफ ुल्ल पटेल आणि सुनील तटकरे या दोन्ही बड्या नेत्यांशी फोनवर संवाद साधण्यार असल्याची माहिती आहे. पक्षात पुन्हा एकजूट निर्माण करण्यासाठी सुनेत्रा पवार चालू आठवड्यातच 'एनसीपी कोअर टीम' सोबत एक विशेष बैठक आयोजित करणार असल्याची माहिती आहे. प्रफ ुल्ल पटेल आणि सुनील तटकरे यांच्यासोबत सुनेत्रा पवार बैठक घेणार असून मतभेद दूर करण्याचे प्रयत्न करणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली.

## पत्नीच्या गुप्तांगावर ॲसिड ओतलं, ती वेदनेनं विव्हळत असतानाही १५ दिवस घरात कोंडलं अनब.. गाठला क्रूरतेचा कळस

**पुणे/प्रतिनिधी :** पुण्यातील उरुळी कांचन परिसरातून माणुसकीला काळिमा फासणारी एक अत्यंत क्रूर आणि संतापजनक घटना समोर आली आहे. चारित्र्याचा संशय आणि 'मुलगा होत नाही' या कारणावरून एका नराधम पतीने धक्कादायक कृत्य केलं. त्याने आपल्या २४ वर्षीय पत्नीवर अमानुष अत्याचार केले. या नराधमाने पत्नीच्या गुप्तांगावर ॲसिड ओतून तिला तब्बल १५ दिवस घरातच डांबून ठेवल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे.

ही थरारक घटना २० एप्रिल रोजी घडली. पीडितेचा पती मद्यधुंद अवस्थेत घरी आला आणि त्याने पत्नीच्या चारित्र्यावर संशय घेत वाद घालण्यास सुरुवात केली. ''तू कामासाठी बाहेर जातेस, तुझे कोणाशी संबंध आहेत ते सांग,'' असं म्हणत त्याने तिला बेदम मारहाण केली. एवढ्यावरच न थांबता, त्याने ॲसिडची बाटली आणून तिच्या गुप्तांगावर ओतली.

असह्य वेदनेने महिला ओरडत असताना आणि जीव वाचवण्यासाठी पळत असताना, या क्रूर पतीने घराचा दरवाजा आतून बंद केला. त्यानंतर त्याने तिला लाथाबुक्क्यांनी मारहाण करून घराबाहेर पडण्यास मज्जाव केला.

''माझ्याकडे उपचारासाठी पैसे नाहीत,'' असे निर्लज्ज कारण सांगत आरोपीने पत्नीला रुग्णालयात नेण्यास नकार दिला. कोणाला काही सांगितल्यास जीवे मारण्याची धमकी देऊन तिला १५ दिवस त्याच जखमी अवस्थेत घरात डांबून ठेवले. अखेर, शनिवारी (९ मे) पती कामावर गेल्याची संधी साधून पीडितेने आपल्या दोन चिमुरड्या मुलींसह घराबाहेर पळ काढला आणि थेट माहेर गाठले. माहेरी आपबीती सांगितल्यानंतर नातेवाईकांनी तिला उरुळी कांचन पोलीस ठाण्यात आणले.

पोलिसांनी घटनेचे गांभीर्य ओळखून पीडितेला तातडीने पुण्यातील ससून रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले. पीडितेने दिलेल्या तक्रारीवरून उरुळी कांचन पोलिसांनी आरोपी पतीविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. पोलीस निरीक्षक सचिन वांगडे यांनी या प्रकरणाचा अधिक तपास सुरू असल्याचे सांगितले आहे.

# इंधन दरवाढीच्या पार्श्वभूमीवर एसटी भाडेवाढीचा प्रस्ताव विचाराधीन - परिवहन मंत्री प्रताप सरनाईक

## डिझेल दरवाढीमुळे एसटी महामंडळावर वार्षिक १२४ कोटी रुपयांचा अतिरिक्त आर्थिक भार

**मुंबई/प्रतिनिधी :** महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या वाढत्या इंधन खर्चाच्या पार्श्र्वभूमीवर प्रवासी भाडेवाढीचा प्रस्ताव विचाराधीन असला, तरी तत्काळ भाडेवाढ करण्यात येणार नसल्याची माहिती परिवहन मंत्री तथा महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिली.



डिझेल दरवाढीच्या पार्श्र्वभूमीवर परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयातील दालनात महामंडळाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांची बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीस एसटी महामंडळाचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ.माधव कुसेकर तसेच अन्य वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

यावेळी मंत्री प्रताप सरनाईक म्हणाले की, डिझेलच्या दरात झालेल्या वाढीमुळे महामंडळावर वार्षिक सुमारे १२४ कोटी रुपयांचा अतिरिक्त आर्थिक भार पडणार आहे. एसटी महामंडळाला दररोज सरासरी १०.८७ लाख लिटर डिझेलची आवश्यकता भासते. सध्या इंडियन ऑईल कॉर्पोरेशनमार्फत डिझेलचा पुरवठा केला जात असून, मागील आठवड्यात प्रति लिटर ८८.२१ रुपये असलेला दर आता वाढून ९१.३१ रुपये झाला आहे. त्यामुळे प्रति लिटर ३ रुपये १० पैशांची वाढ नोंदविण्यात आली आहे. या दरवाढीमुळे महामंडळाला दररोज अंदाजे ३३ लाख ७० हजार रुपयांचा अतिरिक्त खर्च सहन करावा लागत असून, मासिक स्तरावर हा भार सुमारे १० कोटी रुपये, तर वार्षिक स्तरावर सुमारे १२४ कोटी रुपयांपर्यंत जाणार असल्याचे त्यांनी सांगितले.

ते पुढे म्हणाले की, एसटी महामंडळ सध्या आर्थिक अडचणींचा सामना करीत असून, एप्रिल २०२६ मध्ये महामंडळाला सुमारे ७६ कोटी रुपयांचा तोटा सहन करावा लागला आहे. वाढत्या इंधन खर्चाचा थेट परिणाम महामंडळाच्या आर्थिक स्थितीवर होत असून, भविष्यात प्रवासी भाडेवाढीचा निर्णय घेणे आवश्यक ठरू शकते.

तथापि, कोणतीही भाडेवाढ तातडीने लागू करण्यात येणार नसून, केंद्र आणि राज्य शासनाच्या मार्गदर्शनाखाली इंधन दरवाढीच्या अनुषंगाने भाडेवाढीचा प्रस्ताव राज्य परिवहन प्राधिकरणाकडे मान्यतेसाठी सादर करण्यात येणार आहे. संबंधित प्राधिकरणाची मान्यता मिळाल्यानंतरच अंतिम निर्णय घेण्यात येईल, असेही मंत्री सरनाईक यांनी सांगितले.

एसटीने प्रवास करणाऱ्या सर्वसामान्य प्रवाशांवर कमीत कमी आर्थिक भार पडावा यासाठी शासन विविध पर्यायांचा विचार करीत असून, इंधन बचत, ई-बसचा वाढता वापर, खर्च नियंत्रण तसेच महसूलवाढीच्या उपाययोजनांवर विशेष भर देण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले.

ग्रामीण भागातील नागरिकांसाठी एसटी ही अत्यावश्यक सार्वजनिक वाहतूक सेवा असून, सेवा अबाधित राखत आर्थिक संतुलन कायम ठेवणे हे महामंडळासमोरील प्रमुख आव्हान असल्याचेही मंत्री सरनाईक यांनी सांगितले.

## मिसिंग लिंकवर मोबाईल नेटवर्क गायब, आपत्कालीन परिस्थितीत संपर्क कसा साधणार? प्रवाशांचा सवाल

**मुंबई/प्रतिनिधी :** मुंबई-पुणे प्रवास अतिजलद करणारा मिसिंग लिंक प्रकल्प सेवेत दाखल झाला आहे. मोठा गाजावाजा करत नवीन मार्गिका सेवेत दाखल करण्यात आली असून या मार्गिकेची जागतिक स्तरावर नोंद घेण्यात आली आहे. मात्र या मिसिंग लिंकवरून प्रवास करताना प्रवासी-वाहनचालकांना काहीशी गैरसोय, अडचण सहन करावी लागत आहे. ती म्हणजे मिसिंग लिंकवरील बोगद्यातून प्रवास करताना १० ते १२ मिनिटांचा कालावधी अखंड म ोबाईल नेटवर्क मिळत नाही. त्यामुळे आपत्कालीन परिस्थितीत नियंत्रण कक्षाशी वा कोणाशीही कसा संपर्क साधायचा, हा प्रश्न वाहनचालक-प्रवाशांना सतावत आहे.

मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गाची क्षमता वाढविण्यासाठी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने (एमएसआरडीसी) ७ हजार कोटींहून अधिक खर्च करून मिसिंग लिंक बांधली. खोपोली ते कुसगाव अशा १३.३ किमीच्या नव्या मार्गिकेला मि सिंग लिंक म्हणून ओळखले जाते. या मिसिंग लिंकचे १ मे रोजी लोकार्पण झाले आणि त्यानंतर ही मार्गिका सेवेत दाखल झाली. मिसिंग लिंकम ुळे मुंबई-पुणे प्रवासातील ६ किमीचे अंतर कमी झाले असून प्रवासाचा कालावधी ३० मिनिटांनी कमी झाला आहे. त्यामुळे हा प्रकल्प महत्त्वाचा मानला जात आहे. या मिसिंग लिंकमध्ये दोन बोगदे असून हे बोगदे जगातील सर्वात रुंद बोगदे ठरले असून या बोगद्यांची नोंद गिनीज बुकमध्ये झाली आहे. या बोगद्यांची तसेच मि सिंग लिंकवरील देशातील सर्वात उंच केबल स्टेड पुलाची सर्वांनाच भुरळ पडल्याचे चित्र आहे. अनेक जण केवळ हा प्रकल्प पाहण्यासाठी मुंबई-पुणे महामार्गावरून प्रवास करताना दिसतात. मात्र या मार्गिकेवरील बोगद्यातून प्रवास करताना प्रवाशांना मोबाईल नेटवर्कच्या समस्येला सामोरे जावे लागत आहे. बोगद्यातून प्रवास करताना १० ते १२ मिनिटांच्या कालावधीत अखंड नेटवर्क मिळत नसल्याचे चित्र आहे.

नवीन मार्गिका, बोगदा दऱ्याखोऱ्यांतून जाते. आजूबाजूला मानवी वस्ती नाही. अशावेळी कोणतीही आपत्कालीन परिस्थिती उद्भवल्यास वाहनचालक-प्रवाशांना तातडीने नियंत्रण कक्ष, नातेवाईक वा इतरांशी संपर्क साधण्याचा पर्याय या रस्त्यावर उपलब्ध नाही. मोबाईल नेटवर्क नसल्याने अशा परिस्थितीत काय करायचे, या प्रश्नाने प्रवासी-वाहनचालकांमध्ये काहीशी भीतीही आहे. बोगद्याचे काम करतानाच नेटवर्कचा विचार करून त्यासंबंधीची सुविधा उपलब्ध करून देणे आवश्यक होते. मात्र एमएसआरडीसीकडून म ोबाईल नेटवर्कबाबत कोणताही विचार करण्यात आला नसल्याचे सांगून एका प्रवाशाने नाराजी व्यक्त केली. दरम्यान, याबाबत एमएसआरडीसीच्या अधिकाऱ्यांशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला मात्र त्यांच्याशी संपर्क होऊ शकला नाही.

## आरोग्य सेवांमध्ये गुणवत्ता व गतीला प्राधान्य द्या : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**मुंबई/प्रतिनिधी :** : राज्यातील नागरिकांना दर्जेदार व सुलभ आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्यासाठी केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यावर भर देण्यात येत आहे. राज्यातील आरोग्य सेवा परिणामकारक, दर्जेदार आणि नागरिकाभिमुख करण्यासाठी सर्व विभागांनी समन्वयाने काम करत प्रधानमंत्री आयुष्मान आरोग्य मंदिर, क्रिटिकल केअर ब्लॉक आणि प्रयोगशाळांच्या उभारणीची कामे निर्धारित वेळेत पूर्ण करावीत, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

सामाजिक क्षेत्रातील योजनांच्या पाठपुराव्यासाठी मुख्यमंत्री वॉर रूमची स्थापना करण्यात आली आहे. या वॉर रूम अंतर्गत आरोग्य विभागाच्या केंद्र शासन व राज्य शासनाच्या विविध योजनांचा आढावा मुख्यमंत्री फडणवीस यांनी घेतला. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर, सार्वजनिक आरोग्य राज्यमंत्री मेघना बोर्डीकर, मुख्य सचिव राजेश अग्रवाल, मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव लोकेश चंद्रा, प्रधान सचिव डॉ. श्रीकर परदेशी, सार्वजनिक आरोग्य विभागाचे सचिव निपुण विनायक, आयुक्त कादंबरी बलकवडे, वैद्यकीय शिक्षण विभागाचे सचिव धीरज कुमार, वैद्यकीय शिक्षण आयुक्त अनिल भंडारी यांच्यासह वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ तसेच राज्यातील सर्व विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी, महानगरपालिका आयुक्त आणि नगरपालिकांचे मुख्याधिकारी हे दूरदृश्य प्रणालीद्वारे उपस्थित होते.

केंद्र व राज्य शासनाच्या प्रधानमंत्री जन आरोग्य योजना, १५ व्या वित्त आयोगाअंतर्गत पायाभूत आरोग्य सुविधा बळकटीकरण, प्रधानमंत्री आयुष्मान भारत हेल्थ इन्फ्रास्ट्रक्चर मिशन, नवीन वैद्यकीय महाविद्यालयांची उभारणी, एचपीव्ही लसीकरण मोहीम आदींसह विविध प्रलंबित कामांचा यावेळी सविस्तर आढावा घेण्यात आला.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, राज्यात शहरी आणि ग्रामीण भागात दर्जेदार व सहज उपलब्ध आरोग्य सेवा निर्माण करण्यावर शासनाचा विशेष भर आहे. यासाठी तमिळनाडूसह विविध राज्यांच्या आरोग्य व्यवस्थेचा अभ्यास करून महाराष्ट्रासाठी कृती आराखडा तयार करण्यात आला असून त्याची प्रभावी अंमलबजावणी व्हावी.

केंद्र शासनाकडून मिळणारा निधी निर्धारित वेळेत खर्च होणे अत्यंत आवश्यक आहे. त्यामुळे सर्व जिल्हाधिकाऱ्यांनी आयुष्मान आरोग्य मंदिर उभारणे, क्रिटिकल केअर ब्लॉक आणि एकात्मिक सार्वजनिक आरोग्य प्रयोगशाळांची कामे वेगाने करण्यासाठी लक्ष घालावे. सुरुवातीच्या काळात कामांमध्ये विलंब होत होता; मात्र आता जिल्ह्यांची कामगिरी समाधानकारक असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी नमूद केले.

काही जिल्ह्यांची प्रगती तुलनेने कमी असली तरी सर्व जिल्ह्यांनी निश्चित केलेल्या वेळापत्रकानुसार काम पूर्ण करण्यावर लक्ष केंद्रित करावे. प्रलंबित प्रकल्पांमध्ये विभागांमधील समन्वयाचा अभाव राहू नये, यासाठी शासनाने सकारात्मक दृष्टिकोन ठेवून कामे पूर्ण करावीत, असेही त्यांनी स्पष्ट केले.

आरोग्य क्षेत्राला कमी प्राधान्याचे क्षेत्र समजण्याची मानसिकता बदलण्याची गरज असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले. शासनाच्या आरोग्य सुविधांमध्ये गुणवत्ता, स्वच्छता आणि चांगले ब्रँडिंग असावे. शासकीय दवाखाने म्हणजे अस्वच्छ किंवा निकृष्ट, ही नागरिकांची धारणा बदलण्यासाठी अधिकाऱ्यांनी प्रयत्न करावेत. मॉड्युलर तंत्रज्ञानामुळे दर्जेदार आणि वेळेत काम शक्य होत असल्याने अधिकाऱ्यांनी कल्पकतेने काम करण्याचे आवाहनही मुख्यमंत्री फडणवीस यांनी केले.

पुण्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये करण्यात आलेल्या सकारात्मक बदलाचा उल्लेख करत मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, अशा चांगल्या उपक्रमांचा इतर ठिकाणीही अवलंब व्हायला हवा. नागरिकांना शासकीय आरोग्य व्यवस्थेमध्ये गुणवत्ता जाणवली पाहिजे. यासाठी प्रत्येक अधिकाऱ्याने आपल्या कामाची जबाबदारी स्वीकारून लक्ष घालावे.

वैद्यकीय महाविद्यालयांच्या उभारणीतील अडचणी तातडीने दूर करून कामांना गती देण्याचे निर्देश देताना मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले की, अधिकाऱ्यांनी बैठकीत दिलेल्या मुदतींची नोंद करण्यात आली आहे. पुढील वॉर रूम बैठकीत त्याचा आढावा घेतला जाणार असून अधिकाऱ्यांनी दिलेली आश्वासने पूर्ण करणे आवश्यक राहील.

''प्रश्न प्रलंबित ठेवू नका, पाठपुरावा वाढवा,'' असे स्पष्ट निर्देश देताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, एखादा प्रश्न आपल्या स्तरावर सुटत नसेल तर विभाग प्रमुख, सचिव, मुख्य सचिव, मंत्री किंवा मुख्यमंत्री स्तरापर्यंत विषय मांडावा; मात्र काम पूर्ण होईपर्यंत शांत बसू नये. सातत्यपूर्ण पाठपुरावा केल्यास कोणतीही समस्या सुटू शकते, असेही त्यांनी नमूद केले.

# खादी व ग्रामोद्योग मंडळाचा मधुमित्र पुरस्कार लातूरच्या ज्ञानेश्वर मलीले यांना जाहीर

## छत्रपती संभाजीनगर येथे २० मे २०२६ रोजी होणार पुरस्कारांचे वितरण

**लातूर/प्रतिनिधी :** महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळाच्या वतीने दिले जाणारे २०२६ सालचे 'मधुमित्र' व 'मधु-सखी' पुरस्कार लातूरचे ज्ञानेश्वर मलीले, छत्रपती संभाजीनगरचे गणेश बुरकुल, बुलढाण्याचे राजेंद्रदास बैरागी आणि पुण्याच्या श्वेता वायाळ यांना जाहिर झाले आहेत. याशिवाय निवड समितीने ठाण्याचे चंद्रकांत तरे, पुण्याचे संजय मारणे, कोल्हापूरचे दयावान पाटील आणि जळगावचे विद्यानंद आहिरे यांची विशेष सन्मानासाठी निवड केली असल्याची माहिती महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळाचे सभापती (राज्यमंत्री दर्जा) रवींद्र साठे यांनी दिली.

महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळाच्या 'मधाचे गाव' तसेच जागतिक मधमाशी दिनाच्या निमित्ताने योजलेला 'मधु मित्र मधु सखी पुरस्कार' तसेच मंडळाच्या विविध कार्याविषयीची सभापती साठे यांनी दिली. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी लक्ष्मण राऊत, सहमुख्य कार्यकारी अधिकारी रवींद्र ठाकरे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी नित्यानंद पाटील उपस्थित होते.

'मधु मित्र' आणि 'मधु सखी' पुरस्काराचे वितरण २० मे २०२६ या जागतिक मधमाशी दिनी छत्रपती संभाजीनगर येथे आयोजित कार्यक्रमात होणार असल्याचे सांगून सभापती साठे म्हणाले की, महाराष्ट्रातील मधमाशीपालन व्यवसायाला चालना देण्यासाठी राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळाने २०२३ पासून ही पुरस्कार योजना सुरू केली आहे. या पुरस्कारामध्ये स्मृतिचिन्ह, प्रमाणपत्र आणि रोख रक्कमेचा समावेश आहे.

राज्यात मधमाशीपालनास प्रोत्साहन देण्यासाठी मंडळाच्या मध संचालनालयामार्फत प्रशिक्षण, जनजागृती मेळावे, मध महोत्सव, 'मधाचे गाव' योजना तसेच मधुमित्र-मधुसखी पुरस्कार असे विविध उपक्रम राबविण्यात येत असल्याचे सभापती साठे यांनी सांगितले. 'मधाचे गाव' योजनेसाठी राज्य शासनाने १७ कोटी रुपयांची तरतूद केली असून पहिल्या टप्प्यात दहा जिल्ह्यांतील दहा गावांमध्ये काम सुरू झाले आहे. गेल्या दोन महिन्यांत ३४८ मधपाळांना प्रशिक्षण देण्यात आले असून १७५० मधपेट्या, संरक्षण पोशाख, मध यंत्र आणि अन्य साहित्याचे वितरण करण्यात आले आहे.

या योजनेमुळे निसर्ग संवर्धन, मध उत्पादनवाढ, ग्रामीण भागात रोजगारनिर्मिती आणि पर्यटन विकासाला चालना मिळणार असल्याचा विश्वास साठे यांनी व्यक्त केला. महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ गेली ६५ वर्षे कार्यरत असून पंतप्रधान रोजगार निर्मिती कार्यक्रम, मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम, प्रधानमंत्री विश्वकर्मा कौशल्य योजना आणि मध केंद्र योजना यांची अंमलबजावणी मंडळामार्फत केली जात असल्याचे त्यांनी सांगितले.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी स्वदेशी उत्पादनांच्या वापराचे केलेले आवाहन लक्षात घेऊन मंडळाने ''हर घर खादी, घर घर खादी'' ही मोहीम सुरू केली असल्याचेही सभापती साठे यांनी सांगितले.

ग्रामीण भागातील उद्योजकांनी तयार केलेली खादी वस्त्रे, हातकागदापासून बनविलेल्या वस्तू, गणेशमूर्ती तसेच मधापासून तयार होणारी सौंदर्यप्रसाधने नागरिकांनी मोठ्या प्रमाणावर खरेदी करावीत, असे आवाहन सभापती साठे यांनी केले.

राज्यात पारंपरिक मध उत्पादनाला चालना देण्यासाठी शासनाने १२ मधगावांना मान्यता दिली असून त्यामध्ये पालघर जिल्ह्यातील घोलवड, नांदेड जिल्ह्यातील भंडारवाडी, नंदुरबार जिल्ह्यातील बोरझर, हिंगोली जिल्ह्यातील काकडदाभा, नाशिक जिल्ह्यातील चाकोरे, अहिल्यानगर जिल्ह्यातील उडदावणे, परभणी जिल्ह्यातील शेलमोहा, वर्धा जिल्ह्यातील सिंधीविहीर, सातारा जिल्ह्यातील सालोशी, अमरावती जिल्ह्यातील आमझरी, धुळे जिल्ह्यातील रामी आणि रत्नागिरी जिल्ह्यातील तळवडे या गावांचा समावेश आहे. या उपक्रमामुळे ग्रामीण भागातील मध उत्पादकांना बाजारपेठ, प्रशिक्षण व आर्थिक सक्षमीकरणाची संधी उपलब्ध होणार असल्याची माहिती सभापती साठे यांनी यावेळी दिली.

पीएम विश्वकर्मा योजनेअंतर्गत महाराष्ट्रात एकूण २७,५२९ ऑनबोर्डेड ग्रामपंचायतींतील प्रशिक्षणासाठी नोंदणीकृत २,४५,०२६ लाभार्थी असून कर्ज वितरण आर्थिक लाभार्थ्यांची संख्या ५३,५९३ असल्याचे सांगत सभापती साठे यांनी २०२५-२६ या आर्थिक वर्षात मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम अंतर्गत राज्यात ५,७९१ प्रकल्पांना मंजुरी देण्यात आली असल्याची माहिती दिली. यासाठी ९७२३.१८ लाख रूपयांचे मार्जिन मनी मंजूर करण्यात आले. मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम अंतर्गत १,०७८ प्रकल्पांसाठी २०२१.९८ लाख रूपयांचे मार्जिन मनी वितरित करण्यात आले असून या माध्यमातून ८,६२४ रोजगार निर्मिती झाली आहे. त्याचप्रमाणे प्रधानमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम योजनेंतर्गत महाराष्ट्रात १,६२५ प्रकल्पांना मंजुरी देण्यात आली असून ५९४७.५लाख रुपयांचे मार्जिन मनी वितरित करण्यात आले असल्याचे सभापती साठे यांनी सांगितले.

# पावसाचे पाणी शिवारातच अडविण्यासाठी लोकसहभाग आवश्यक -सहकार मंत्री पाटील

**लातूर/प्रतिनिधी :** गतवर्षी अहमदपूर तालुक्यातील विविध गावांमध्ये झालेल्या जलसंधारणाच्या कामांमुळे पाणी पातळी वाढण्यास मोठी मदत झाली आहे. याच धर्तीवर यंदाही मोठ्या प्रमाणावर नदी-नाले खोलीकरण आणि बॅरेज परिसरातील सरळीकरणाची कामे हाती घेतली जात आहेत. आपल्या गावाच्या शिवारात पडणारे पाणी आपल्याच शिवारात अडवणे हा या मोहिमेचा मुख्य उद्देश असून या कामासाठी लोकसहभाग आवश्यक असल्याचे राज्याचे सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी सांगितले.

गुगदळ येथील हे नदी खोलीकरण व रुंदीकरणाचे काम महाराष्ट्र शासनाचा मृद व जलसंधारण विभाग, नाम फाऊंडेशन, सिद्धी शुगर अँड अलाईड इंडस्ट्रीज आणि टाटा मोटर्स फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने होत आहे. या मोहिमेअंतर्गत प्रातिनिधिक स्वरूपात तालुक्यातील सात गावांमध्ये नदी व नाल्यांमधील गाळ काढण्याची मोहीम सुरू करण्यात आली असून गुदगळ येथे या मोहिमेचे सहकार मंत्र्यांच्या हस्ते उद्घाटन रविवारी करण्यात आले.



या कार्यक्रमाला जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड, जिल्हा परिषद उपाध्यक्ष दयानंद सुरवसे, समाज कल्याण सभापती उत्तम माने, जिल्हा परिषद सदस्य प्रफुल्लचंद्र गुंडरे, अश्विन नागराळे, भानुदास पोटे, तहसीलदार उज्ज्वला पांगारकर, लघु पाटबंधारे विभागाचे कार्यकारी अभियंता महेंद्र काळे, जिल्हा जलसंधारण अधिकारी जावेद पटेल, गट विकास अधिकारी पंकज शेळके, सिद्धी शुगरचे कार्यकारी संचालक अविनाश जाधव, नाम फाऊंडेशनचे विलास चामे, टाटा मोटर्स फाऊंडेशनचे प्रमोद घायाळ आणि उत्तम सुरनर, चापोलीचे सरपंच भालचंद्र चाटे, हदगळचे सरपंच बाळासाहेब मुंढे यांच्यासह परिसरातील ग्रामस्थ व शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

ग्रामीण भागाचा कायापालट करण्यासाठी आणि भूजल पातळीत वाढ करण्यासाठी राज्य शासनाने जलसंधारणाच्या कामांना प्राधान्य दिले आहे. याचाच एक भाग म्हणून अहमदपूर तालुक्यात गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार अभियान आणि जलतारा प्रकल्पांतर्गत नदी खोलीकरण, रुंदीकरण व सरळीकरण कामांचा शुभारंभ करण्यात आला. या कामांमुळे परिसरातील भूजल पातळी वाढण्यास मोठी मदत होणार असून, पावसाचे पाणी गावातच अडवून जिरवण्याचा महत्त्वपूर्ण संकल्प या माध्यमातून करण्यात आला असल्याचे सहकार मंत्री श्री. पाटील म्हणाले. तसेच भूजल पुनर्भरणासाठी प्रत्येक गावात शोषखड्डे तयार करण्यात यावेत. तसेच, शेतकऱ्यांनी पारंपरिक शेतीला दुग्ध व्यवसायासारख्या जोडधंद्याची जोड द्यावी. कृषी विभागाने उपलब्ध करून दिलेल्या सुविधांचा लाभ घेत माती परीक्षण करावे आणि त्यानुसारच खतांचा समतोल वापर करावा, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

राज्य शासन शेतकरी आणि ग्रामीण जनतेच्या सर्वांगीण विकासासाठी कटिबद्ध आहे. दळणवळण सुविधा, मोफत आरोग्य, घरकुल योजना यांसह शेतकऱ्यांसाठी दिवसा वीज पुरवठा आणि सूक्ष्म सिंचनासाठी मोठ्या प्रमाणावर आर्थिक व तांत्रिक मदत पुरवली जात आहे. पायाभूत सुविधा निर्मितीतून सर्वसामान्य नागरिकांच्या विकासाला गती देण्यात येत असल्याचे सहकार मंत्री श्री. पाटील यावेळी म्हणाले.

जलसंधारणाची कामे व्यापक स्वरूपात करून पावसाचे जास्तीत जास्त पाणी अडवण्याचा प्रशासनाचा मानस आहे. परंतु, पाणी साठवण्यासोबतच त्याचा काटकसरीने वापर करणेही तितकेच गरजेचे आहे. यासाठी शेतकऱ्यांनी मोठ्या संख्येने सूक्ष्म सिंचनाकडे वळावे, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड यांनी केले.

सहकार मंत्री श्री. पाटील यांनी अहमदपूर तालुक्यातील अहमदपूर तालुक्यातील थोडगाव येथील पाझर तलाव, तसेच शेणकुड, येस्तार, मावलगाव येथील बॅरेजच्या कामांची त्यांनी पाहणी केली. तसेच गुगदळ येथे नाला खोलीकरण व रुंदीकरण कामाचा शुभारंभ त्यांच्या हस्ते झाला.

## केशवराज मंदिरात पंच कुंडात्मक याग पवमान स्वाहाकार महायज्ञाचे आयोजन

**लातूर/प्रतिनिधी :** येथील श्री केशवराज मंदिरात दि. २१ ते दि. २३ मे २०२६ या कालावधीत पंच कुंडात्मक महाविष्णू याग व पवमान स्वाहाकार महायज्ञाचे आयोजन करण्यात आले आहे. हा धार्मिक विवधि श्रीक्षेत्र मोहटादेवीचे प्रधान आचार्य बबनदेव कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडणार आहे. प्रत्येक तीन वर्षांनी येणाऱ्या अधिकमासाच्या निमित्ताने यावर्षीच्या अधिकमासामध्ये पूर्णवादाचार्य सद्गुरु श्री रामचंद्र महाराज पारनेरकर यांच्या शुभाशिर्वादाने व पूर्णवाद वर्धिष्णू विष्णू महाराज पारनेरकर यांच्या प्रेरणेने सदर धार्मिक सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. यज्ञकाळात सामूहिक श्री विष्णू सहस्त्रनाम पठण, सामूहिक श्री सूक्त पठण व कुंकुमार्चन तसेच स्वर्णीनंद ग्रुपकडून गायनसेवा सादर होणार आहे. दररोज सायंकाळी आठ ते नऊ या वेळेत भजनसेवा होणार आहे. या पवित्र काळात श्री केशवराजच्या मूर्तीस तीन दिवस विष्णू सहस्रनामासह १ लाख तुलशी अर्पण केल्या जातात. या सोहळ्याचे मुख्य महाप्रसाद यजमान दीपक हरी कोटलवार हे आहेत. मुख्य तुलशी अर्चना यजमान पापशेठ ताथवडे परिवार, मुख्य यज्ञ यजमान धर्मवीर भारती, आयोजक केशवराज मंदिर हे आहेत. या धार्मिक सोहळ्याचा लाभ भाविक भक्तांनी घ्यावा,असे आवाहन केशवराज मंदिरचे विश्वस्त अध्यक्ष एड. संजय पांडे, उपाध्यक्ष बजरंगलाल रांदड, सचिव मधुकर पाठक, अशोक गोविंदपूरकर, पापासेठ ताथोडे, ॲड. कालिदास देशपांडे, मनोहर सावळे, मधुसूदन भुतडा, दामोदर भुतडा, राजाभाऊ पांडे, शाम कोटलवार, योगेश उन्हाळे, सुनील अयाचित, सुमुख गोविंदपूरकर यांनी केले आहे.

## लातूर जिल्ह्यातील टंचाईग्रस्त भागात २ टँकर, ६३ विहिरींद्वारे पाणीपुरवठा

**लातूर/प्रतिनिधी :** सध्या जिल्ह्यातील ग्रामीण भागांमध्ये पाणी टंचाईची समस्या जाणवू लागली असून प्रशासनाकडून विविध उपाययोजना राबवल्या जात आहेत. १५ मे रोजीच्या अहवालानुसार जिल्ह्यातील एकूण १० तालुक्यांपैकी जळकोट तालुक्यामध्ये टँकरद्वारे पाणी पुरवठा सुरू आहे. याठिकाणी २ गावांमध्ये आणि एका वाडीवर पाणी पुरवण्यासाठी २ शासकीय टँकर मंजूर करण्यात आले आहेत. जळकोट तालुक्यासाठी मंजूर करण्यात आलेल्या टँकरच्या दैनंदिन ४ फेऱ्या पूर्ण क्षमतेने सुरू आहेत. यामध्ये प्रामुख्याने शिवाजी नगर तांडा व वाघमारी तांडा आणि गव्हाण गावात टँकरद्वारे पाणी पुरवठा मंजूर करण्यात आला आहे.

टँकरची आवश्यकता नसलेल्या मात्र पाणी टंचाई जाणवत असलेल्या इतर तालुक्यांमध्ये प्रशासनाने खाजगी विहिरी आणि विंधन विहिरींचे अधिग्रहण करून पाणी पुरवठ्याची सोय केली आहे. संपूर्ण लातूर जिल्ह्यात सध्या ६३ विहिरी व विंधन विहिरींचे अधिग्रहण करण्यात आले असून, यात अहमदपूर तालुक्यात २७, औसा तालुक्यात १५ विहिरी अथवा विंधन विहिरींचे आले आहेत. तसेच उदगीर तालुक्यात ११, चाकूर तालुक्यात ४, जळकोट तालुक्यात ४, लातूर तालुक्यात १ आणि रेणापूर तालुक्यात १ विहीर किंवा विंधन विहीर अधिग्रहित करून गावकऱ्यांना पाणी पुरवठा केला जात आहे. ग्रामीण पाणी पुरवठा विभागाच्या जिल्हा परिषद ग्रामीण पाणी पुरवठा विभागाच्या कार्यकारी अभियंत्यांच्या वतीने या संपूर्ण टंचाई निवारण कामावर देखरेख ठेवली जात आहे.

## भर कार्यक्रमात महसूलमंत्र्यांना कागदाने वारा! अमरावतीच्या जनता दरबारातील तो व्हिडिओ चर्चेत

**अमरावती/प्रतिनिधी :**राज्याच्या राजकीय वतुर्ळात सध्या एका अनोख्या व्हिडिओची जोरदार चर्चा रंगली आहे. अमरावती जिल्ह्यातील दर्यापूर येथे आयोजित करण्यात आलेल्या 'जनता दरबार' कार्यक्रमात भाजपच्या महिला शहराध्यक्षा मेघा भारती यांनी चक्क महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांना कागदाने वारा घातल्याचा प्रकार समोर आला आहे.

या घटनेचा व्हिडिओ सोशल मीडियावर वाऱ्यासारखा पसरला असून, त्यावर विविध प्रतिक्रिया उमटत आहेत.

नेमका प्रकार काय?

दर्यापूर येथे नागरिकांच्या समस्या जाणून घेण्यासाठी आणि त्यांच्या प्रलंबित तक्रारींचे निवारण करण्यासाठी स्थानिक प्रशासन आणि महसूलमंत्र्यांच्या उपस्थितीत एका जनता दरबाराचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात मंत्री बावनकुळे हे नागरिकांच्या तक्रारी ऐकून घेत त्यांच्याशी संवाद साधण्यात मग्न होते. मात्र, याच वेळी त्यांच्या शेजारी उभ्या असलेल्या भाजपच्या महिला शहराध्यक्षा मेघा भारती यांनी हातात एक कागद घेतला आणि त्या चक्क मंत्र्यांना वारा घालू लागल्या. भर कार्यक्रमात घडलेल्या या प्रकारामुळे उपस्थितांच्या भुवया उंचावल्या.विशेष म्हणजे, मेघा भारती वारा घालत असल्याचे लक्षात येताच मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी क्षणाचाही विलंब न लावता त्यांना तसे करण्यापासून रोखले. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, मंत्र्यांनी त्यांना सार्वजनिक कार्यक्रमांमध्ये शिष्टाचार आणि प्रोटोकॉल पाळण्याची सक्त सूचनाही दिली. मंत्र्यांनी स्वत: हस्तक्षेप करून हा प्रकार तत्काळ थांबवला असला तरी, तोपर्यंत ही घटना कॅमेऱ्यात कैद झाली होती. त्यानंतर अल्पावधीतच हा व्हिडिओ सोशल मीडिया प्लॅटफ फॉर्मवर व्हायरल झाला आणि राजकीय चर्चांना उधाण आले.या व्हायरल व्हिडिओवर सोशल मीडिया वापरकर्त्यांकडून संमिश्र प्रतिक्रिया पाहायला मिळत आहेत. एका बाजूला, अनेकांनी या घटनेवर सडकून टीका केली असून हा केवळ अतिउत्साह आणि अनावश्यक राजकीय खुशामत करण्याचा प्रकार असल्याचे म्हटले आहे. तर दुसऱ्या बाजूला, काही लोकांनी बावनकुळे यांच्या तत्परतेचे कौतुक केले आहे. मंत्र्यांनी स्वत: या कृतीला प्रोत्साहन न देता वेळीच रोखल्याने त्यांनी एक चांगला संदेश दिल्याची भावना काही युजर्सनी व्यक्त केली आहे. सध्या राज्यभरात आढावा बैठका आणि जनसंपर्क मोहिमांमध्ये व्यस्त असलेल्या बावनकुळे यांनी नुकतीच मुंबईतही अधिकाऱ्यांची कानउघाडणी केली आहे.

## खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल युवकांसाठी 'अमृत' संस्थेतर्फे मोफत ड्रोन प्रशिक्षण

### प्रशिक्षणानंतर अधिकृत ड्रोन पायलट परवानाही मिळणार

**लातूर/प्रतिनिधी :** आजच्या आधुनिक काळात शेती, फोटोग्राफी, सर्वेक्षण, सुरक्षा यांसह अनेक तांत्रिक क्षेत्रांमध्ये ड्रोनचा वापर मोठ्या प्रमाणावर केला जात आहे. सामान्यतः ड्रोन चालवण्याचे प्रशिक्षण घेण्यासाठी मोठा खर्च करावा लागतो. मात्र, महाराष्ट्र शासनाच्या अमृत संस्थेमार्फत खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील युवकांना हे प्रशिक्षण पूर्णपणे मोफत दिले जात आहे. हे प्रशिक्षण यशस्वीरीत्या पूर्ण केल्यानंतर उमेदवारांना अधिकृत ड्रोन पायलट परवाना देखील दिला जाणार आहे.

महाराष्ट्र संशोधन, उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी (अमृत) ही महाराष्ट्र शासनाची स्वायत्त संस्था असून, ती खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी विविध कौशल्य विकास आणि रोजगाराभिमुख प्रशिक्षण कार्यक्रम राबवते. याच अंतर्गत संस्थेने 'अमृत ड्रोन मिशन' हा उपक्रम हाती घेतला असून, त्याद्वारे हे ड्रोन ऑपरेटर प्रशिक्षण सुरू करण्यात आले आहे.

या प्रशिक्षणाचा लाभ राज्यातील अनेक युवक घेत असून, त्यांना आधुनिक तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात करिअर करण्याची मोठी संधी उपलब्ध होत आहे. विशेषतः ग्रामीण भागातील युवकांना रोजगार आणि स्वयंरोजगाराच्या संधी मिळाव्यात, हा या योजनेचा मुख्य उद्देश आहे. या प्रशिक्षणाचा कालावधी १० दिवसांचा असून, यादरम्यान उमेदवारांच्या राहण्याची आणि जेवणाची संपूर्ण व्यवस्था अमृत संस्थेमार्फत मोफत केली जाणार आहे, तसेच प्रशिक्षणासाठी कोणतेही शुल्क आकारले जाणार नाही.

या योजनेचा लाभ खुल्या प्रवर्गातील अशा आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना दिला जातो, ज्यांना इतर कोणत्याही शासकीय संस्था किंवा महामंडळांचा लाभ मिळत नाही. यामध्ये सद्यस्थितीत ब्राह्मण, कायस्थ, कोमटी/वैश्य, मारवाडी, पटेल, राजपूत, यलमार, अय्यंगार, राजपुरोहित, पाटीदार, नायर, नायडू, कम्मा, कानबी, सिंधी, बनिया, बंगाली, त्यागी, सेनगुनथर, गुजराथी, ठाकूर, जाट, लोहाना, हिंदू नेपाळी व भूमिहार अशा २५ जातींचा समावेश आहे.

या योजनेसाठी अर्ज करणाऱ्या उमेदवाराच्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न ८ लाख रुपयांपेक्षा कमी असणे आवश्यक असून, अर्जदार हा महाराष्ट्राचा रहिवासी असावा. तसेच त्याचे वय १८ ते ५५ वर्षांच्या दरम्यान असावे आणि तो किमान १२ वी उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. या प्रशिक्षणात शेतकरी कुटुंबातील उमेदवारांना प्राधान्य दिले जाणार असून, अर्जासोबत वैद्यकीय फिटनेस प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य राहील. इच्छुक आणि पात्र उमेदवारांनी अमृत संस्थेच्या जिल्हा कार्यालयाशी संपर्क साधावा किंवा ऑनलाइन अर्ज करावा, असे आवाहन जिल्हा व्यवस्थापक शुभम मुळजकर यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी उमेदवारांनी १ ला मजला, पितृछाया बिल्डिंग, मयूरेश्वर अपार्टमेंट, सिग्नल कॅम्प, विद्यानगर, लातूर - ४१३५१२ या पत्त्यावर किंवा ७३९१०६५४७० या संपर्क क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## ४५ वर्षांनंतर फुटली वाचा, खाणं-पिणंही झालं होतं कठीण

### अखेर मुंबईतील रुग्णालयात घडला मोठा चमत्कार

**मुंबई/प्रतिनिधी :** निसर्गाने दिलेली सर्वात साधी गोष्ट जेव्हा एखाद्या व्यक्तीसाठी तब्बल ४५ वर्षांचे कोडे बनते तेव्हा जगणं किती ठिकण होतं असेल? नागपूरच्या एका व्यक्तीने अशाच एका गोष्टीचा सामना केला आहे. पण मुंबईत झालेल्या एका चमत्काराने त्यांचे संपूर्णच आयुष्यच बदलून टाकले आहे.

जगण्याची आशा सोडली होती, पण ४५ वर्षांनंतर

प्रत्येकजण लहानपणापासून जेवणासाठी, पाणी पिण्यासाठी तसेच बोलण्यासाठी तोंडाचा वापर करतो. मात्र जर एखाध्याला जन्मापासून आपले तोंडच उघडता आले नाही तर?. नागपूरमध्ये वास्तव्यास असलेल्या एका ४५ वर्षीय व्यक्तीला याच भयानक समस्येचा सामना करावा लागलाय. मात्र मुंबई शहरातील एका खाजगी रुग्णालयात त्यावर यशस्वी शस्त्रक्रिया झाली त्यामुळे त्यांना आता सर्वसामान्यांप्रमाणे आयुष्य आनंदात जगता येत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, नागपूरमधील व्यक्तीला आपले तोंड जन्मापासून फक्त ०.५ सेमी उघडता येत होते. त्यामुळे त्यांना कधीच नीट जेवता सुद्धा आले नाही किंवा स्पष्ट बोलता आले नाही. महत्त्वाचे म्हणजे तोंडाची स्वच्छता करणेही खूप कठीण जात होते. लहानपणापासून असलेल्या त्रासाला कटांळून त्यांनी पहिली शस्त्रक्रिया ही २००३ मध्ये केली त्यानंतर त्यांचे तोंड हे ३ सेमीपर्यंत उघडू लागले. दुर्देव म्हणजे काही वर्षांनी ही समस्या त्यांना पुन्हा जाणवू लागली आणि त्यांचे तोंड हे फक्त दीड सेमीपर्यंत मर्यादित राहिले. त्यामुळे त्यांनी जगण्याची पूर्णच आशाच सोडून दिली होती.

अखेर इंटरनेटवर असताना त्यांना याच क्षेत्रातील एका तज्ज्ञ डॉ. तोफिक बोहरा यांच्याबद्दल माहिती मिळाली आणि त्यांनी माहिती काढून मुंबईत उपचार सुरु केले.

धक्कादायक म्हणजे मुंबईत आल्यानंतर त्यांनी तपासणी केली तेव्हा त्यांना 'टेम्पोरोमॅन्डिब्युलर जॉइंट अँकायलोसिस' हा दुमिळ आजार असल्याचे निदान झाले. या आजारात जबड्याचे सांधे हाडांची अतिरिक्त वाढ झाल्याने एकमेंकाना जोडले जातात. ज्यामुळे जबड्याची हालचाल होणे पूर्णपणे बंद होते. या पूर्वी पहिली शस्त्रक्रिया झाल्याने दुसरी शस्त्रक्रिया करणे हे डॉक्टरांपुढे एक महत्त्वाचे आव्हाहन बनले होते. जर कोणतीही चूक झाल्यास या व्यक्तींना पॅरालिसिस होऊ शकत होता.

मुंबईत ठरल्या प्रमाणे डॉ. तोफिक बोहरा आणि त्यांच्या टीमने ही शस्त्रक्रिया पूर्ण केली आणि त्यांनी जबड्याला अडथळा ठरणारे जुने हाड काढून सांध्यामध्ये जागा तयार केली. एवढेच नाही तर पुन्हा हाड जोडले जाऊ नये म्हणून रुग्णाच्या पोटातील चरबाची थर हा तिथे बसवला शिवाय अनेक वर्षांपासून जबडा हा लॉक झाल्यामुळे चेहऱ्याचा आकार बिघडला सुद्धा होता. जो सुधारण्यासाठी त्यांनी जेनिओप्लास्टी केली आणि चेहऱ्याचा आकार ठीक केला.

आनंदाची गोष्ट म्हणजे शस्त्रक्रियेनंतर त्यांचे तोंड व्यवस्थित उघडू लागले. त्यांनी तब्बल ४५ वर्षांनंतर पहिल्यांदा पूर्ण तोंड उघडले आणि खणखणीत आवाजात हाक मारली. त्यांना असं पाहून सर्वांचे डोळे भरुन आले.

## आयटीआयच्या जागांमध्ये वाढ; नाशिक, अमरावती व मुंबईतील सरकारी संस्थांच्या जागेत घट

**मुंबई/प्रतिनिधी :** यंदा औद्योगिक प्रशिक्षण संस्थांच्या (आयटीआय) जागांमध्ये गतवर्षीच्या तुलनेत तब्बल ७ हजार ४ जागांची वाढ झाल्याने प्रवेशासाठी विद्यार्थ्यांना १ लाख ५७ हजार ६६४ जागा उपलब्ध झाल्या आहेत. मात्र सरकारी संस्थांच्या तुलनेत खासगी संस्थांमध्ये ही वाढ अधिक आहे. त्याचबरोबर नाशिक, अमरावती व मुंबई या विभागामध्ये खासगी संस्थांच्या जागांमध्ये वाढ झाली असली तरी सरकारी संस्थांच्या जागांमध्ये लक्षणीय घट झाली आहे. राज्यामध्ये जागांमध्ये झालेल्या वाढीमध्ये पुणे विभागात सर्वाधिक २ हजार ४१६ जागांची वाढ झाली आहे. आयटीआय प्रवेश प्रक्रिया २१ मे पासून सुरू होत आहे.

## पालि भाषा संशोधन केंद्रातर्फे गुणवंत विद्यार्थ्यांचा धम्मगौरव सन्मान

**लातूर/प्रतिनिधी :** इयत्ता दहावीच्या शालांत परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करून शाळेत प्रथम क्रमांक मिळवणाऱ्या कु. आदिती बालाजी कांबळे व विशेष प्राविण्यासह उत्तीर्ण झालेल्या आदर्श सिद्धार्थ कांबळे यांचा पालि भाषा संशोधन व प्रशिक्षण केंद्र, लातूर यांच्या वतीने धम्मगौरव गुणसन्मान पत्र, स्मृती चिन्ह व महापुरुषांचे पुस्तक देऊन सत्कार करण्यात आला.

कु. आदिती बालाजी कांबळे हिने गौरीशंकर विद्यालय, धनेगाव येथून इयत्ता १० वीच्या परीक्षेत ९० टक्के गुण मिळवून शाळेत प्रथम क्रमांक प्राप्त केला. तसेच आदर्श सिद्धार्थ कांबळे याने दयानंद विद्यालय येथून ८९ टक्के गुण मिळवून विशेष प्राविण्यासह उत्तीर्ण होण्याचा मान मिळविला. दोघेही विद्यार्थी सेलू, ता. जि. लातूर येथील रहिवासी आहेत.



भगवान बुद्ध यांच्या प्रज्ञा, करुणा आणि समतेच्या पवित्र धम्ममार्गावर प्रेरित होऊन सत्यनिष्ठ परिश्रम, सम्यक प्रयत्न, शिस्त, जिद्द आणि शिक्षणातून समाजप्रबोधनाची दिशा या मूल्यांचा गौरव म्हणून पालि भाषा संशोधन व प्रशिक्षण केंद्र यांच्या वतीने हा धम्मगौरव गुणसन्मान पत्र सप्रेम, सन्मानपूर्वक आणि अत्यंत अभिमानाने प्रदान करण्यात आला. संस्थेचे सचिव राहुल गायकवाड यांनी स्वतः सेलू येथे जाऊन विद्यार्थ्यांचा गुणगौरव करून सन्मान केला. यावेळी त्यांनी सांगितले की, शिक्षण हेच दुःखमुक्तीचे, स्वाभिमानाचे आणि मानवमुक्तीचे प्रभावी साधन असून तथागतांच्या या महान संदेशाला विद्यार्थ्यांनी आपल्या कर्तृत्वातून नवी ऊर्जा दिली आहे.

या विद्यार्थ्यांनी आपल्या यशातून केवळ कुटुंब, शाळा आणि शिक्षकांचेच नव्हे, तर संपूर्ण बहुजन समाजाचे नाव उज्ज्वल केले आहे. त्यांचे हे यश इतर विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी दीपस्तंभ ठरावे तसेच समाजात समता, बंधुता, मैत्री आणि करुणेची ज्योत अधिक प्रज्वलित व्हावी, अशी मंगल कामना पालि भाषा अभ्यासक सदानंद कापूरे यांनी व्यक्त केली.

सूत्रसंचालन व आभार पवन कांबळे कांबळे यांनी मानले. याप्रसंगी बौद्धाचार्य भैयासाहेब कांबळे, फडतरे मामा, सोलापूर आणि विद्यार्थ्यांचे पालक तसेच गावातील नागरिक उपस्थित होते.

हे पत्रक मालक, प्रकाशक, संपादक अशोक नामदेवराव हनवते यांचे करीता मुद्रक घोणे नरसिंह पांडूरंग यांनी मॅजिक पब्लीकेशन, शॉप नं. १०, मनपा शॉपींग कॉम्प्लेक्स, गांधी चौक, लातूर - ४१३५१२ येथे छापून कार्यालय द्रोपत माय निवास, खडक हनुमान मंदिर, मिलिंद नगर, लातूर ता. जि. लातूर ४१३५१२ येथे प्रकाशित केले.